
घटक २
वीर विश्वासाचे
रविवार शाळा
WOW!
शिक्षक पुस्तक
सर्व वयोगटांसाठी

# विश्वासाचे वीर

**"मुले महत्वपूर्ण आहेत" यांच्या द्वारे रविवार शाळा अभ्यासक्रम**

**शिक्षक पुस्तक**

**सर्व वयोगटांसाठी**

**घटक 2: धडे 1-13**

**वेब:**

**www.ChildrenAreImportant.com/heroes/**


## मुले महत्वपूर्ण आहेतच्या संपूर्ण समूहाचे आभार!

संपादक: क्रिस्टीना क्रॉस

क्रिएटिव्ह टीम: ॲबिल पालासीस कॅमाचो, अरेली जुरीएल सलीनास सांचेझ, ड्वाइट क्रॉस, जेनिफर संचेझ निएतो, ज्युलियो सांचेझ निएतो, माइक कांगस, मोन्सराट डुरान डीआझ, सुकी कांग्स, वेरोनिका तोज आणि विकी कांगसण् या कृतीक्रमातील अद्भुत संगीत रूबेन डारियोबद्दल धन्यवाद!

अनुवाद कृतीसंघ: अलिनेव्हिएरा, अनुपमा वानखेडे, ॲन्टोन क्लेमिक, अराझ ममदझादे, अरोमा पब्लिकेशन्स आणि मीडियाए आर्टूरो जूनियर बोरॉन, ब्लेसी जेकब, कारमेला डॉन फ्लॉरेस, क्रिसब्रेसनाहन, डेव्हिड राजू, एफ्राइम नुनुगुना मिरोबी, फिनॅनी जेकब, गेनाव, हामिद रेझा अझीमीअझीमी ;हॅमिड एझीमी 1364 जीएम : एआयएल कॉमद्ध, हेयूयड्रे, आय.स्क्लेव्हर, इकबालमन, जेकब कुरुविला, कमिल्तुरु करंगुरू मवांगी, किरण मैत्रेय मंडल, मार्को चू, मार्कोस रोचा, मॅथ्यू दास, मितेश मंडलीया, मृरामलामा, श्रीमती गीताश्री नवनीथ कृष्णन, नसीम बुगताए निकबेंक, पॉल म्वांगीए पॉल सेप्टन, राणा 922, रुबिना राय, सफदर खान, शाहरोशान 15, टॅलेन्टो.यूनिडो, उरिटोम, वर्दीया ज्युलियायाह कॅसरिका, येओ जंग चिन, जिना मिरेल्ला बरझागा अरेनियाबिया

# प्रस्तावना

रविवार शाळाच्या विश्वासाचे वीरच्या दुस-या घटकामध्ये स्वागत आहे!

जुन्या करारात आपण वेगवेगळया नायाकांच्या द्वारे आपल्या विश्वासाबद्दल शिकलो, आता आपला विश्वास आपण कशावर अधारित करतो हे पाहणे महत्वाचे आहे, आणि दुस-या घटकात आपले लक्ष त्यावर केंद्रित असेल. जेव्हा आपण खुर्चीवर बसतो तेव्हा आपण विश्वास ठेवतो कि खुर्ची आपले वजन सहन करिल, आणि ती तुटणार नाही किंवा आपल्याला जमीनीवर पडू देणार नाही. खुर्चीवर आपला विश्वास आहे, तिच्या शक्तिवर, हे समजण्यात कि ती आपल्याला धरून ठेवील. देवाच्या बाबतीतही तसेच आहे. देव कोण आहे हे जेव्हा आपण जाणतो तेव्हा आपला विश्वास स्पष्ट आणि साधा असतो. देव कोण आहे हे जाणणे आवश्यक आहे जेणे करून आपण त्याच्याठायी विश्राम करू शकू. ज्या रितीने आपल्याला माहित आहे कि खुर्ची आपल्याला धरून ठेवील, त्याच रितीने आपल्या हे जाणण्याची गरज आहे कि देव कोण आहे आणि तो आपल्याला धरून ठेवतो. हया घटकाचे वचन हे सांगते कि सर्वप्रथम आपण हा विश्वास ठेवला पाहिजे कि देव आहे. देव खंरच आहे! हया ग्रहावर आपण एकटे नाही, देवाने जग निर्माण केले आणि त्याने आपल्याला निर्माण केले. दुसरी गोष्ट आपण हा विश्वास ठेवला पाहिजे कि जे त्याचा शोध करतात त्यांना तो प्रतिफळ देतो. पवित्र शास्त्र देवाबद्दल जे सांगते त्यावर आपण विश्वास ठेवला पाहिजे. आपण सरळ जुन्या करारातील गोष्टींकडे उडी मारणार आहोत, परंतू आता आपण देवावर लक्ष केंद्रित करणार आहोत. आपण देवाच्या चरित्राकडून जे शिकू शकतो ते हे, तो कोण आहे आणि वेगवेगळया परिस्थितीत तो कसा वागतो? जस जसे आपण देवाबद्दल अधिक शिकतो आणि सर्व गोष्टींवर विश्वास ठेवतो, तसा आपला विश्वास मजबूत होतो. देवाचे आभार मानन्याचा तो चांगला मार्ग आहे, कारण आपले मुख्य वचन सुध्दा म्हणते......

“आणि विश्वासावाचून त्याला संतोषविणे अशक्य आहे, कारण देवाजवळ जाणा-याने असा विष्वास ठेवला पाहिजे की तो आहे आणि त्याचा शोध झटून करणा-यांना तो प्रतिफळ देणारा आहे.” इब्री 11:6

हया घटकामध्ये वीर खेळ तीनदा खेळण्यासाठी आम्ही पूरेसे प्रश्न समाविष्ट केले आहेत. आमचा सल्ला आहे कि धडा 4, 8 आणि 13 मध्ये तुम्ही हा खेळ खेळावा. उदा. सामान्य वर्गानंतर एक तास किंवा आठवडयाच्या इतर कुठल्या दिवशी खेळ खेळावा. शिक्षक हया नात्याने हया खेळाचा उपयोग मुलांना शिकविण्यासाठी आणखी एक साधन म्हणून करा.

तुम्हाला समर्थन देण्यासाठी आम्ही घटक 1 मधील दृष्टांत आणि कृतीची पुनरावृत्ती केली आहे कि हया साहित्याचा व त्यातील विविध भगांचा कसा उपयोग करावा. आशा आहे कि हया मुळे मुलांचे जीवन परार्वतित करण्यासाठी हया कृतीक्रमाचा किंवा साहित्याचा उपयोग करण्यासाठी तुमची मदत होईल.

हया घटक मध्ये हया जगाचा निर्माता, जो जुन्या करारात होता व ज्याने कृती केले आणि जो आजही जिवंत आहे व आपल्या मध्ये आहे त्या सर्वव्यापी देवासमोर जाण्यासाठी आम्ही तुम्हाला आव्हान करतो.

विश्वास विरांच्या जीवनाकडे पाहण्यासाठी आपल्या सभोवतालच्या मुलांना निर्देशित करून देव तुमचे जीवन आर्शिवादित करो.

प्रेमपूर्वक,

मुले महत्वपूर्ण आहेत संघ



# हया साहित्याचा उपयोग कसा करावा

## कथा/ ठराव आश्यक आहे

*“एक महान शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देणारा नसतो, परंतू तो त्या ज्ञानात त्यांची आवड जागृत करतो आणि त्यांना स्वतःसाठी त्याचा पाठपुरावा करण्यासाठी उत्सुक करतो.’- एम जे बेरील.*

**वेळापत्रक**

उघडा:

- स्वागत आहे
- कथा आवश्यक आहे
- गाणे

मुख्य पाठ
क्रयिाकलाप (पर्यायी)
आवश्यक कथा संकल्प

**विद्यार्थी पुस्तके**

- टाइमलाइन
- क्रयिाकलाप पृष्ठ

प्रश्न आणि उत्तरे (जुन्या विद्यार्थ्यांना)
गेम (पर्यायी)
उपस्थिती
असाइनमेंट

तुमच्या मुलांना केवळ वर्गात लक्ष देण्यासाठी नव्हे तर वर्गात जे शिकविले जाते ते त्यांच्या जीवनात लागू करण्यासाठी त्यांना प्रेरणा देणे आश्चयक आहे. अनेक जण मिठाई आणि बक्षीसं देउन किंवा जर त्यांनी लक्ष दिले नाही तर त्यांना शिक्षा करून मुलांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न करतात. जरी हया दोन्ही पद्वती तुम्हाला वर्गात चांगले वर्तन देतील तरी ते त्यांना शिकविलेल्या तत्वांचे पालन करण्यासाठी प्रेरित करू शकत नाही. ख्रिस्ती मंडळी मध्ये मुलांचे शिक्षक हया नात्याने आपण त्यांना केवळ प्रौढांच्या सभे मध्ये त्यांनी व्यत्यय आणू नये म्हणून त्यांना गुंतवून ठेवत नाही तर आपण नविन विश्वासणा-यांची पिढी वाढविण्याचा प्रयत्न करीत आहोत जी देवाचे अनुकरण करते, त्याला ओळखते आणि त्याची सेवा करते. जरी हे आपल्यापैकी प्रत्येकासाठी कठिण काम असले तरी, आश्र्चयाची गोष्ट म्हणजे देवाला प्रत्येक मुलाची काळजी आहे आणि तो आपल्याला पूढे चलत राहण्यासाठी आणि प्रत्येक मुलाच्या जीवनात प्रेरणा देण्यासठी आणि त्याची सेवा करण्यासाठी त्याची शक्ति देतो.

तुमच्या मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही प्रत्येक धडयाच्या सुरवातीला ‘आवश्यकतेची गोष्ट’ पूरविली आहे, त्यांना देवासाठी त्यांची गरज अनुभवण्यासाठी आणि जे काही ते शिकत आहेत ते घरी त्यांच्या ख-या जीवनात लागू करण्यास मदत करण्यासाठी. प्रत्येक गोष्टी मध्ये आम्ही तयार केलेले पाच पैकी एक काल्पनिक पात्र असेल. त्याचे नाव बदलण्यास मोकळी असू दया. एक कल्पना अशी आहे कि दर आठवडी स्वयंसेवकांना त्या गोष्टीचा अभिनय करण्यास सांगणे. जर ते व्यवहारिक नसेल तर, तुम्ही ती गोष्ट फक्त वाचून दाखवू शकता. तुम्ही मुलांना ती समस्या सोडविण्यासाठी कल्पना किंवा विचार विचारू शकता. त्यांच्या कल्पना वाईट, चांगल्या, चूक किंवा बरोबर आहेत असे त्यांना सांगू



नका आणि सध्या त्यांना काही उपाय सांगू नका. न सोडविलेल्या तणावाचा उपयोग मुलांना धडयात लक्ष देण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी वापरा.

निर्णय भाग धडयाच्या शेवटी येतो. जर मुलं खूप वेळ बसलेले असतील तर निर्णय भागाच्या आधी सुध्दा एखादी कृती करा. जेव्हा तयारी होईल तेव्हा मुलांना आवश्यक गोष्ट आठवण करून द्या आणि मग तुमच्या कलाकारांना त्यांच्या पात्रातुन बाहेर यायला सांगा किंवा फक्त ते सांगा. हया मुळे आवश्यक गोष्टींतील तणाव कमी करण्यास मदत होईल आणि मुलं शाळेत किंवा घरी ज्या समस्यांचा सामना करतील त्यासाठी त्यांना मदत होईल. अशा प्रकारे, तुम्ही मुलांना त्यांच्या दैनंदिन जीवनात हया धडयांचे लागूकरण करण्यासाठी प्रवृत्त कराल.


## मुख्य धडा

हा अभ्यासक्रम जुन्या कराराचे एक अवलोकन आहे. अनेक धडयांमध्ये, तुम्ही पवित्र शास्त्रातील व्यक्तिच्या किंवा वीराच्या संपूर्ण जीवनाकडे पाहणार आहात. शिक्षक हया नात्याने तुम्ही हा अभ्याक्रम स्वतः अभ्यासासाठी वापरू शकता आणि दिलेले शास्त्रपाठ आधिच वाचा व नवीन अंर्तदृष्टी देखील प्राप्त करा.  प्रत्येक वीराच्या जीवनाचा सारांश धडयामध्ये समाविष्ट आहे. मुलांना उत्सुक ठेवण्यासाठी त्यांना विचारा कि त्यांना त्या वीराच्या जीवनाबद्दल अधिक काही आठवतं का.

कृपया गोष्टीचा भाग लहान ठेवा, म्हणजे तुम्हाला मुख्य मुद्दा सांगण्यासाठी वेळ मिळेलः लागुकरण. प्रत्येक धडयाच्या शेवटी मुलांसाठी एक निर्णय असेल. पूर्ण धडयाचा हा मुख्य मुद्दा असेल, जसा फुटबॉल बॉल गेम मध्ये गोल करणे. जर तुम्ही खेळ नीट खेळले, आणि संघातील इतर खेळाडूंना बॉल दिला आणि विरोधी संघातील खेळाडूं पासून जर तो सुरक्षित ठेवला, परंतू तुम्ही गोल केलाच नाही तर तुम्ही कधीच जिंकत नाही. खात्री करा की तुम्ही मुख्य लागूकरणापर्यंत पोहचाल जेणे करून मुलांना त्यांच्या जीवनात ते लागू करण्यासाठी मदत मिळेल. याकोब 1:22-24 मध्ये आपण वाचतो कि, 'वचना प्रमाणे आचारण करणारे असा केवळ ऐकणारे असू नका अशाने तुम्ही स्वतःची फसवणूक करता, कारण जो कोणी वचन नुसते ऐकून त्याप्रमाणे कृति करीत नाही तर तो आरशांत आपले शारीरिक मुख पाहणा-या मनुष्यासारखा आहे. तो स्वतःला पाहून तेथून जातो आणि आपण कसे होतो हे तेव्हाच विसरतो.' 1 करिंथ 10 मध्ये आपण जुन्या करारातील गोष्टी वचतो ज्या आपल्यासाठी उदाहरण आहेत कि आपण काय करावे आणि काय करू नये. जुन्या वीरांकडे पाहणे म्हणजे स्वतःला आरश्यात पाहण्यासारखे आहे, जे आपल्याला त्यांच्या जीवनातून शिकण्याची संधी देते. आपल्या मुलांना त्यांचे अनुकरण करणे शिकवू या आणि त्यांच्या चुकांकडून शिकून देवासाठी जगणे शिकवू.

## काल रेखा

दर आठवडी वीराच्या जीवनाचे प्रतिक म्हणून मुलं त्यांच्या पुस्तकातील काल रेखेवर रेष काढतील जेणे करून पवित्र शास्त्र गोष्टी मधील. उदा. धडा 1 मध्ये ते 1 अक्षर असलेल्या पहिल्या धडयामध्ये ते एहूदाचे जीवन शोधतात. कल्पना अशी आहे कि धडयात दिलेल्या आकडयांनुसार मुलं अंदाज लावतात कि रेखा कुठून सुरू होईल आणि कुठ पर्यंत जाईल. प्रत्येक चैकोन 100 वर्ष दाखविल किंवा त्याचे प्रतिनिधित्व करेल. उदा. एहूदाचे जीवन ख्रिस्त पूर्व 1300 नंतर सुरू होते आणि ख्रिस्त पूर्व 1200, पर्यंत 4/5 संपते. प्रत्येक वीराचे जीवन व त्यातील आश्चर्यचकित करणा-या गोष्टी पाहणे मजेशीर राहिल, जसे कि दबोरा आणि गीदोन शास्ते जेफथात, शमशोन आणि शमुवेल हयांच्या बरोबर सारख्याच समयी जगले.




## कार्य

मुलांना त्यांनी शिकलेले धडे जीवनात उतरविण्यासाठी आणखी एक साधन म्हणजे प्रत्येक आठवडयात दिला गेलेला गृहपाठ. प्रत्येक धडयात अशी क्रिया असते जे मुले आठवडयाच्या मध्ये करू शकतात.

योहान 14:23 मध्ये येशूने म्हटले, *"जर कोणी माझ्यावर प्रीति करतो तर तो माझी शिकवण पाळील, माझा पिता त्याच्चावर प्रीति करील. आम्ही त्याच्याकडे येऊ व त्याच्याबरोबर राहू."*

हया कृती किंवा गृहपाठामूळे मुलं त्यांच्या जीवनात देवाला आठवडया दरम्यान आणू शकतात केवळ चर्च मध्येच नव्हे. मोठया मुलांसाठी पवित्र शास्त्रामधून वाचनाची कृती आहे. गृहपाठ कृतीची चर्चा करण्यासाठी वर्गात काही वेळ घ्या आणि त्यांना सराव करण्यासाठी वर्गात संधी दया. ज्या मुलांनी कार्य पूर्ण केले त्यांना लहानसे बक्षीस किंवा चाकलेट दया.

## हजेरी/वीर खेळ







हया सामग्री बरोबर उपस्थित राहिल्या बद्दल बक्षीस देण्यासाठी कार्डांचा एक संच सुध्दा आहे. परंतू तो एक खेळ सुध्दा होवू शकतो! घटकाच्या शेवटी ... 13 धडे, किंवा 3 महिने, मुलं कार्डांचा वार करून खेळ खेळू शकतात. अधिक माहितीसाठी खेळ सूचना वाचा.

**पर्यायी खेळ:**

मुलांना कागदाच्या तुकडयावर 1-10 आकडे लिहायला सांगा. नंतर शिक्षक खेळाच्या सूचनांमध्ये दिलेले कोणतेही 10 प्रश्न विचारतील. कोष्ठकामध्ये दिलेले गुणविशेष सांगू नका. प्रत्येक प्रश्नासाठी, त्या परिस्थितीत कोणत्या गुणविशेषाची गरज आहे हे विद्यार्थी लिहितील.: सामर्थ्य, सत्यता, आज्ञाधारकपणा, नम्रता, हृदय किंवा विश्वास. ज्यानी सर्वात अचूक अंदाज लावला तो चाकलेट किंवा बक्षीस जिंकतो.

# 1. देव प्रार्थनेचे उत्तर देतो



**पवित्र शास्त्रातील गोष्टः एहोद**

शास्ते 3:12-30

## पाठांतर वचन 1

“कशाविषयीही चिंताक्रांत होऊ नका, तर सर्व गोष्टींविषयी प्रार्थना व विनंती करून आभारप्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा.” फिलिप्पैकरांस पत्र 4:6

## आवश्यकतेची गोष्ट 1



बझला एका वर्षापासून वाईट वाटत होते कारण जरी तो स्वतः विरूध्द झगडत होता तरी तो ज्या गोष्टी त्याने पाहू नये हे माहित असूनही त्या गोष्टी दाखविणा-या गोष्टी पाहण्यापासून तो स्वतःला आवरू शकत नव्हता. तो नेहमी म्हणत असे, ‘मी आता पासून ते पाहणार नाही कारण ते बरोबर नाही. ही गोष्ट देवाला आनंद देत नाही,’ आणि दररोज त्याच्या लक्षात येण्याआधी तो एखादया गुलामासारखा टिवीच्या समोर बसलेला असायचा, तो पर्यंत जेव्हा त्याला हे कळले कि तो एकटा हया विरूध्द लढू शकत नाही. आणि तो आग्रहाची प्रार्थना करू लागला.

## मुख्य धडा 1

विश्वास वीर रविवार शाळेमध्ये आपले पुन्हा एकदा स्वागत आहे! आपण जुन्या करारातील महत्वाच्या लोकांकडे पाहत होतो कि ते देवाबरोबर कसे जुळले आणि देवाने त्यांच्या जीवनात कसा हस्ताक्षेप केला. आपण हया सर्व गोष्टी पाहत असतांना आपण आपल्या जीवनातही प्रोत्साहित होवू शकतो. आज आपण पवित्र शास्त्रामधील विचीत्र गोष्ट पाहणार आहोत. इस्त्राएल लोकांनी यहोशवाच्या नेतृत्वाखाली वचनदत्त देश जिंकल्या नंतर त्यांनी तिथे घरं घेतले आणि शेतं पेरले व त्या ठिकाणी बराच काळ राहीले. त्या वेळेस लोक देवाला विसरले आणि जे खरे देव नव्हते अशा इतर वस्तूंची भक्ति करू लागले! तुम्ही आणि मी सुध्दा पापी आहोत आणि जरी आपण प्रयत्न करत असलो तरी आपण सहसा जे चूक ते करत असतो. इस्त्राएल लोकांना शिक्षा करण्यासाठी देवाने आजूबाजूच्या मवाबी लोकांना आणले, ज्यांनी इस्त्राएलला जिकूंन त्यांना 18 वर्ष पर्यत छळले! हा मोठा समय आहे. कधी कधी आपल्या जीवनात देवाची शिक्षा ओळखण्यासाठी आपल्याला पुष्कळ वेळ लागतो. जेव्हा आपण येशूचा स्वीकार करतो तेव्हा आपण देवाच्या कुटुंबात येतो आणि देवाचे मुलं व मुली बनतो आणि कोणतीही गोष्ट हे बदलू शकता नाही. एका चांगल्या पित्याप्रमाणे देवा आपल्याला शिक्षा करून त्याची आज्ञा कशी पाळावी हे शिकविल. आपल्या जीवनात आपण जे निर्णय घेतो त्याचे परिणाम असतात. जेव्हा इस्त्राएल लोकांना कळले कि त्यांचे संकट त्यांच्या स्वतःच्या वागणूकिचे परिणाम होते तेव्हा त्यांनी देवाने त्यांना सोडवावे म्हणून प्रार्थना केली. आपण कठिण प्रसंगी देवाची मदत मागू शकतो. त्यानंतर आपण विश्वास ठेवला पाहिजे कि देव आपली मदत करील परंतू आपल्या अपेक्षेनुसार तो ती करणार नाही. इस्त्राएल लोकांची अपेक्षा होती कि देव एखादा योध्दा उभा करेल जो सर्व इस्त्राएल लोकांना एकत्र करून मोठी सेना तयार करेल व जो देश त्यांचा छळ करत आहे त्याच्यावर हल्ला करेल. देवाने तसे केले नाही. त्या ऐवजी त्याने डावखो-या एहोदाला पाठविले ज्यांने असे दाखविले कि मवाबी राजासाठी त्याच्या कडे गुप्त संदेश आहे आणि मग

त्याने त्याला त्याच्याच राजमहलात मारले! त्यानंतर त्याने इस्राएल लोकांना एकत्र केले, परंतू एक सेना तयार करून हल्ला करण्या ऐवजी ते नदी पार करण्याच्या ठिकाणी थांबले आणि जो मवाबी तिथे येत होता त्याला ते मारत होते. ज्या रितीने देवाने इस्राएल लोकांना एहोद नावाच्या एका मनुष्याकरवी अनपेक्षित रित्या सोडविले त्याच रितीने त्याने संपूर्ण जगाला त्याचा पुत्र येशू हयाच्या द्वारे अनपेक्षित रित्या सोडविले. इस्राएल लोकांची अपेक्षा होती कि एक राजा येईल आणि तारण करेल, परंतू येशू सौम्य रित्या आला आणि आपल्यासाठी मरण पावला आणि पुन्हा जिवंत झाला जेणे करून जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवेल त्याचे तारण होईल. पुढच्या वेळेस जेव्हा तुम्ही संकटात राहाल किंवा कठिण प्रसंगात असाल तेव्हा टि वी पाहणारा आपला मित्र बझ सारखं लक्षात ठेवा कि देव प्रार्थना ऐकतो. देवाला मदत मागा आणि तो अनपेक्षित रित्या तुमची कशी मदत करतो ते पहा.


## निर्णय 1



एक दिवस प्रार्थना केल्यावर त्यांच्या घरा शेजारी नवीन शेजारी राहायला आले आणि लवकरच ते बझचे मित्र बनले आणि तो त्यांच्या बरोबर दररोज दुपारी खेळू लागला. हे मजेशिर होते. एका आठवडयानंतर त्याच्या लक्षात आले कि टिवी पाहण्या ऐवजी तो आता नेहमी खेळत होता आणि आता त्याच्या कडे टिवी पाहण्यासाठी वेळ नव्हता. मग त्याने देवाचे आभार मानले कि त्याला आता स्वतंत्र झाल्यासारखे वाटत होते व टिवी पाहण्याची गरज नव्हती.

## कृती 1

**आंधळी कोंबडी**



हया कार्यासाठी, एक मुलगा किंवा मुलगी निवडा ज्याच्या डोळयाला पट्टी राहील. इतर मुलं गोल करतील आणि डोळयाला पट्टी असलेला मुलगा मधे राहील. कोणताही खेळाडू खेळाची जागा सोडून जावू शकणार नाही. डोळयाला पट्टी बांधलेला खेळाडू इतरांपैकी एकाला हात लावण्याचा प्रयत्न करेल आणि स्पर्शा द्वारे हे ओळखण्याचा प्रयत्न करेल कि ती व्यक्ति कोण आहे. तुम्ही मुलांना व मुलींना वेगवेगळे करू शकता जेणे करून ते वेगवेगळे खेळतील.

## काल रेखा 1

हया प्रश्नांच्या माहितीनुसार मुलं एहोदासाठी काल रेखा आखू शकतील. एहोदाने इस्राएलचे नेतृत्व करणे केव्हा सुरू केले, उ. आपल्याला नक्की माहित नाही, परंतू असे मानले जाते कि त्याने ख्रि. पू. 1297 मध्ये सुरवात केली. एहोदाने इस्राएलचे नेतृत्व किती वर्ष केले? उ. 80 वर्ष.

## कोडे उत्तर 1



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हो | द | णे | दे | क्षा | शि | प्रा | स | णे |
| णे | प्रा | र्थ | ना | क | रा | ले | द | त्रा |
| क्षा | क्ति | ले | ळ | क्षा | वि | म | ळ | प |
| वा | ळ | भ | बी | श्वा | र्थ | णे | पा | रि |
| श | च | त्रा | स | आ | व | पा | श | णा |
| हो | प्रा | वि | णे | हो | दे | बी | वा | म |
| य | ले | म | ले | बी | त्रा | प्रा | क्षा | द |
| णे | र्ती | आ | ज्ञा | पा | ळ | णे | हो | त |
| मू | ळ | द | म | द | हू | ए | बी | ले |



## प्रश्न उत्तर 1

**(मोठ्या मुलांसाठी)**

1. जर देव मला एहोदासारखे काहीतरी धाडसी करायला लावतो आणि मला जर भिती वाटली तर? भिती वाटणे ठिक आहे काय?
2. धाडसी असणे म्हणजे भिती न वाटणे नाही परंतू भिती वाटत असूनही पूढे जाणे आहे.
3. चूक केल्यावर तुम्हाला कोणती शिक्षा प्राप्त झाली? वेगवेगळया शिक्षेबद्दल व तुमची चूक केव्हा असते व तुमची चूक केव्हा नसते हया बद्दल बोलण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करा.
4. लढाया चांगल्या आहेत का? एखादयाचा खून करणे आणि लढाईत एखादयाला मारणे हया बद्दल चर्चा करा. आपल्या जगातील लढाईबद्दल त्यांना वेगवेगळे मत मांडू दया आणि आज होत असलेल्या लढायांबद्दल बोलण्यास विसरू नका.

## खेळ 1

**देवाला हाक मारणे**



मुलांना आणि मुलींना वेगवेगळे करून खेळ खेळा. मुलं ओळीत उभे राहून हात धरतात. नंतर शेवटच्या मुलांना धरलेल्या हातावरून किंवा हाताखालून जायला लावा व जो पर्यंत सर्व गुंतत नाही तो पर्यंत करायला सांगा. असं झाल्यावर ते देवाला हाक मारतील व म्हणतील, 'देव आमची मदत कर!' मग संघातील एक खेळाडू येवून त्यांना गुंता सोडविण्यसाठी मदत करेल.

## हजेरी 1




वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्साहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहेः

**प्रार्थना**

## गृहपाठ 1

हया आठवडयाचा गृहपाठ हा आहे कि तुमच्या शाळेच्या वर्गात प्रार्थना करा, एखादया अस्वस्थ कारणा-या प्रसंगाबद्दल ज्यातून तुम्ही जात आहात, उदा. एखादा विद्यार्थी किंवा शिक्षक. डोळे बंद करू नका किंवा मोठयाने काही बोलू नका कारण देव तुमचे विचार आणि तुमचे मन ऐकू शकतो. एखादया विशिष्ट आणि व्यवहारिक गोष्टीसाठी प्रार्थना करा जेणे करून तुम्ही देवाचा प्रतिसाद पाहू शकाल.

**वाचा**

दिवस 1 शास्ते 4: 1-5
दिवस 2 शास्ते 4: 6-10
दिवस 3 शास्ते 4: 11-14
दिवस 4 शास्ते 4: 15-20
दिवस 5 शास्ते 4: 21-24

# 2. देव न्यायी आहे



**पवित्र शास्त्रातील गोष्टः दबोरा**

शास्ते 4:1-24, 2:24-27

## पाठांतर वचन 2

"आणि विश्वासावाचून त्याला 'संतोषवणे' अशक्य आहे; कारण देवाजवळ जाणाऱ्याने असा विश्वास ठेवला पाहिजे की, तो आहे, आणि त्याचा शोध झटून करणाऱ्यांना तो प्रतिफळ देणारा आहे." इब्री लोकांस पत्र 11:6

## आवश्यकतेची गोष्ट 2



कॅमेटच्या गोष्टी मध्ये एक दिवस, रविवार शाळेची शिक्षिका येवू शकली नाही कारण ती आजारी होती. ती कॅमेट सोबत बोलली व त्याने त्यादिवशी मुलांची काळजी घ्यावी असे तिने सांगितले. त्याला ही काळजी घायची होती कि त्यांनी वर्ग सोडून बाहेर जावू नये, फक्त शास्त्राचा एक खेळ खेळावा. कॅमेटने हयाचा स्वीकार करण्यास संकोच केला. त्याने विचार केलाः 'मी इथं बसून केवळ ऐकणं ठिक आहे.' जेव्हा शिक्षकाने पाहिले कि त्याने काही उत्तर दिले नाही तेव्हा कृपाकरून म्हटले. कॅमेटने स्विकार तर केला पंरतू त्याने त्याच्या वर्गातील दुस-या कोणालातरी जवाबदारी दिली आणि म्हटले की तो त्याला मदत करेल.

## मुख्य धडा 2

विश्वासाचे वीर हया मध्ये पुन्हा एकदा स्वागत आहे! मागील वेळी आपण शिकलो कि देवाने कसे एहोद नावाच्या मनुष्याद्वारे इस्त्राएल राष्ट्राची अनपेक्षित रित्या सुटका केली. हया वेळे आपण पाहणार आहोत कि देव न्यायी आहे. पुन्हा इस्त्राएल लोकांनी पाप केले आणि कनानचा राजा याबीन हयाने त्याच्या सेनेचा सेनापती सीसरा हयाच्या मदतीने त्यांना पिडीले. त्यावेळे दबोरा नावाची एक संदेष्टी होती जिने खजूरीच्या झाडाखाली बसून इस्त्राएल लोकांचे नेतृत्व केले. संदेष्टा म्हणजे ती व्यक्ति जी देवाचे शब्द बोलते, दबोराच्या द्वारे देवाने बराक नावाच्या मनुष्याला इस्त्राएल लोकांना एकत्र करून सीसराच्या सैन्या विरूध्द हल्ला करण्यासाठी बोलाविले. मागील आठवडी आपण शिकलो कि जेव्हा आपण संकटात असतो तेव्हा देवाची मदत मागावी. कधी कधी दुस-यांना मदतीची गरज असते आणि देव आपल्याला आजच्या गोष्टीतील कॅमेट नावाच्या मुलासारखी त्यांची मदत करण्यासाठी बोलावित असतो.जेव्हा देव तुम्हाला बोलावितो तेव्हा तुमचा प्रतिसाद काय राहिल? बराकाने दबोराला सांगितले कि तो तेव्हा जाऊन लढेल जेव्हा ती त्याच्या बरोबर जाईल. जेव्हा आपण घाबरतो तेव्हा आपण न दिसणा-या देवा पेक्षा दिसणा-या लोकांवर विश्वस ठेवण्याच्या मोहात पडतो. आपण विसरून जातो कि देव किती मोठा आहे. देव इतका मोठा आहे की त्याने संपूर्ण विश्व निर्माण केले. त्याने इतके मोठे तारे निर्माण केले ज्याची तुम्ही कल्पना करू शकत नाही आणि इतक्या दूर कि ते तुम्ही पाहू शकत नाही. त्याने विशाल समुद्र, मोठे आकाश निर्माण केले, त्याने तरंगणारे ढग निर्माण केले, तो संपूर्ण इतिहास होता आणि त्याला भविष्यातील सर्वात लहान सहान गोष्टी माहित आहेत.

आकाशाकडे वर पहा किंवा अकाशाची कल्पना करा आणि लक्षात ठेवा कि ते किती मोठे आहे. जेव्हा तो तुम्हाला बोलावितो तेव्हा तुम्ही विश्वास ठेवू शकता कि तो तुमच्या बरोबर राहील आणि जे काही तुम्ही मागातल त्याच्यात तुमची मदत करेल. जेव्हा तुम्ही विचार कराल कि जे तुम्ही करणार ते भिती दायक आहे तेव्हा आकाश, तारे, आणि पर्वत हयांचा विचार करा आणि लक्षात ठेवा कि तुम्हाला घाबरविणा-या गोष्टी पेक्षा देव खूप मोठा आहे. बराकाने देवावर विश्वास ठेवला नाही परंतू त्याने दबोरावर भरवसा ठेवला म्हणून देवाने दुस-या स्त्रीला सीसराला मारण्याचा बहुमान दिला. बराक आणि इस्त्राएल लोक युध्द जिंकत होते कारण देव त्यांच्या बरोबर होता. सीसरा पळाला आणि त्याचा जिच्यावर विश्वास होता त्या स्त्रीच्या तंबूमध्ये जाऊन लपला आणि थकून गेल्यामूळे तो झोपी गेला. तो झोपला असतांना तिने त्याला जीवे मारले आणि जेव्हा इस्त्राएल लोकांनी विजयाचे गीतं गाईली तेव्हा त्यांनी बराका ऐवजी ज्या स्त्रीने सीसराला मारले तिच्याबद्दल गीत गाईले. देव न्यायी आहे आणि येशू म्हणाला कि आपण जे काही करू त्यानुसार तो आपल्याला मोबदला देईल. आपल्याला काही मोबदला पृथ्वीवर आणि काही स्वर्गात प्राप्त होईल. काही का असेना, आपण निश्चित असावे कि आपण त्याच्यासाठी धाडस दाखविले तर देव आपल्याला मोबदला देईल.

मी ओळखतो कि देव न्यायी आहे आणि मी हया जीवनात जे काही करील त्यानुसार तो मला मोबदला देईल.

## निर्णय 2

मंडळीच्या पाळकाने कॅमेटसाठी लहानसे बक्षीस तयार केली होते. ते त्याला मदत केल्याबद्दल लहानसे बक्षीस देणार होते. जेव्हा पाळकाला कळले कि दोन व्यक्तिंनी वर्ग सांभाळला तेव्हा त्याला ते पैसे दोघांमध्ये विभागावे लागले. सर्व काही झाल्यावर कॅमेटच्या लक्षात आले की त्याने खरंच मदत केली नाही.



## कृती 2

**न्यायालय**

मुलं गोल बसतील; शिक्षक प्रसंग तयार करतील उदा. एक पिता त्याच्या मुलांसाठी हया अटीवर स्केट विकत घेतो कि त्यांनी ते वाटून खेळावे. मुलगी तिच्या भावाकडून ते लपवून ठेवते हयासाठी कि त्याने ते वापरू नये कारण त्याच्या पायांचा घाणेरडा वास येतो. हे योग्य आहे कि अयोग्य? तुमच्या उजवी कडे बसलेला मुलगा/मुलगी न्यायधीशाची भूमिका करेल आणि त्याने मोठयाने सांगावे कि प्रसंग योग्य वाटतो कि अयोग्य. परंतू त्या आधी इतर मुलांनी ज्यूरी असावे. प्रथम ज्यांना वाटते की प्रसंग योग्य किंवा न्याय आहे त्यांनी हात वर करावे आणि मत मोजणी करावी. नंतर ज्यांना वाटते की प्रसंग अयोग्य किंवा न्यायी नाही त्यांनी हात वर करावे आणि मत मोजणी करावी. एका मिनीटानंतर न्याधीश अंतीम निर्णय देतील मोठयाने स्पष्ट आवाजातः योग्य कि अयोग्य. नंतर दुसरा व्यक्ति येईल, आणि काय योग्य ठरले असते हे ठरविण्यासाठी त्यांची मदत करील.




## काल रेखा 2

एहूद नंतर इस्त्राएलचे नेतृत्व कोणी केले? उ. दबोरा
दबोराने किती वर्ष नेतृत्व केले? उ. 40 वर्ष

## कोडे उत्तर 2

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सू | ळ | छ | इ | सा | ब | ए | सू |
| उ | भ | र | व | सा | व | श्वा | दे |
| ब | ए | ना | त्त | ष्टी | वि | दे | स |
| ब | वि | क | क | उ | ना | त्रा | उ |
| रा | इ | उ | य | ळ | सि | इ | रा |
| क | बो | सू | दे | ना | ब | क्षी | स |
| सा | दे | द | उ | सा | ए | व | सि |
| सं | व | इ | स्त्रा | ए | ल | भि | ळ |
| ब | दे | ळ | सि | उ | व | सू | ती |
| ए | उ | ष्टी | क | ना | दे | ष्टी | ब |





## प्रश्न उत्तर 2

**(मोठ्या मुलांसाठी)**


1. आपण दररोज कोणत्या गोष्टी करतो ज्या देव पाहू शकतो? तो आपल्याला मोबदला देईल का? (शिक्षकांनो असा अभिनय करणे चांगले राहील कि तुम्ही विश्वास ठेवत नाही कि देव सर्वकाही पाहतो आणि बोलून त्यांचे विचार जाणून घेणे योग्य ठरेल. उदा. जेव्हा मी टीवी पाहतो तेव्हा तो मला पाहत नाही.... इ. शेवटी सांगा की देव सर्व काही पाहतो. ही कृती तुमच्या विद्यार्थ्यांचे डोळे उघडील.)

2. मला केवळ टीवी पाहायला पाहिजे. हे ठीक आहे का? का नाही? (काही गोष्टी नैतीक रित्या वाईट नसतात, परंतू वेळ वाया घालविणा-या असतात. आपण सर्वांनी दररोज विश्रांती घेतली पाहिजे. परंतू तुमच्या विद्यार्थ्यांबरोबर बोला कि ते व्हिडिओ गेम खेळण्यात किंवा टीवी पाहण्यात किती तास घालवितात, हे समजण्यासाठी कि ते पुष्कळ वेळ वाया घालवित आहेत. जर देव आपल्याला प्रत्येक गोष्टीसाठी प्रतिफळ देतो तर मग चांगल्या गोष्टी अधिक करणे चांगली कल्पना नाही का?)

3. स्वर्ग कसा असेल? (आपल्या प्रत्येकाकडे स्वर्गाबद्दल वेगवेगळे उत्तरं आहेत. कधी कधी जग आपल्याला सांगते की स्वर्ग कंटाळवाना असेल, आपण केवळ ढगांवर तरंगत राहू आणि काहीच करणार नाहीच परंतू ज्या देवाने हे जग निर्माण केले तोच दुसरे जग निर्माण करणार आहे सर्व चांगल्या गोष्टीसह आणि कुठल्याही वाईट गोष्टीं शिवाय. पवित्र शास्त्र सांगते कि आपण कल्पना करू शकतो त्यापेक्षा ते अधिक चांगले असणार आहे. तुमच्या मुलांबरोबर उत्तमातील उत्तम आणि भरपूर मोठा मोबदला हयाची कल्पना करा. त्यांना विचारा, ते आय पॅड 2 जिंकण्यासाठी काय करतील? देव स्वर्गात हया सारखे चांगले मोबदले देईल काय?


## खेळ 2

**अंधळे चित्र**



सहभागींना दोनच्या जोडीत विभागा. त्यांना एकमेकांकडे पाठ करून बसायला सांगो. प्रत्येक जोडीतील एक मुलाला पेन आणि कागद दया आणि दुस-याला चित्र दया. ज्या व्यक्तिकडे चित्र आहे त्याने ते काय आहे हे न सांगता त्याचे वर्णन करावे. उदा. जर चित्र सफरचंदातील अळीचे आहे तर तुम्ही असे म्हणून शकत नाही की, 'सफरचंद व त्यातील अळीचे चित्र काढ.' तुम्ही म्हणू शकता, 'डावी कडे गोलाकार काढ' हातात पेन आणि कागद असलेली व्यक्ति वर्णनानुसार चित्र काढेल. 10 किंवा 15 मिनिटाची वेळ ठरवून घ्या.

## हजेरी 2




वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्साहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहेः

**दबोरा**

## गृहपाठ 2

हया आठवडयाच्या गृहपाठासाठी येशू बद्दल बोलणे, कोणाला तरी प्रोत्साहित करणे किंवा तुमच्या आईवडीलांची घरात मदत करणे जी दररोज करण्याची तुम्ही जवाबदारी घेता ते निवडा. ते घरी किंवा शाळेत असू शकते. आणखी तुम्ही मंडळीत काही तरी सेव करण्यासठी स्वयंसेवा करू शकता. जर त्याची भिती वाटली तर, वर ता-यांकडे किंवा ढगांकडे पहा आणि विचार करा कि ज्या देवाने हे निर्माण केले तो आपला देव किती मोठा

**वाचा**

दिवस 1: शास्ते 6:1-13

दिवस 2: शास्ते 6:14-26

दिवस 3: शास्ते 6:27-40

दिवस 4: शास्ते 7:1-15

दिवस 5: शास्ते 7:16-25

# 3. देव त्याच्या वचनाची पुष्टी करतो



**पवित्र शास्त्रातील गोष्टः गिदोन**

शास्ते 6:1-7:25

## पाठांतर वचन 3

“तरी परमेश्वराची आशा धरून राहणारे नवीन शक्ती संपादन करतील; ते गरुडाप्रमाणे पंखांनी वर उडतील; ते धावतील तरी दमणार नाहीत, चालतील तरी थकणार नाहीत.”

यशया 40:31

## आवश्यकतेची गोष्ट 3



बझचा भाऊ एक तरुण मुलगा आहे. एक दिवस तो शास्त्र वाचत होता आणि प्रार्थना करत होता आणि देवाने त्याला सांगितले...कि देव त्याचा वापर त्याच्या मंडळीतील गीत गाणाऱ्या गटात करणार आहे! तो आश्चर्यचकित झाला कारण त्याला कोणतेही वाद्य वाजीवता येत नव्हते, म्हणून त्याच्या मनात शंका होती, आणि त्याला वाटले कि तो चुकत होता.

मग त्याने देवाकडे प्रार्थना केली आणि त्याला विचारले कि त्याची खरोखर अशी इच्छा आहे का...

## मुख्य धडा 3

मागील आठवड्यात, आपण बघितले कि कशा प्रकारे बाराकाने देवा पेक्षा अधिक माणसांवर विश्वास ठेविला. ह्या आठवड्यात आपण गिदोन नावाच्या एका माणसाबद्दल शिकणार आहो. पुन्हा एकदा, इस्राएल लोकांनी पाप केले, आणि मिद्यानांनी त्यांना इतक्या वाईट रिती ने छळले कि त्यांच्याकडे अन्न किंवा प्राणी सुद्धा राहिले नाही. त्यांना गुप्त पणे अन्न बनवावं लागलं. प्रत्येकजण गुप्त पणे अन्न खात असे. एक दिवस देवाचा एक देवदूत गिदोनाकडे आला आणि त्याच्या बरोबर बोलला, त्याने त्याला सांगितले कि देव त्याचा बरोबर इस्राएल देशाला सोडविणार आहे. त्याने गीदोनाला त्याच्या सामर्थ्याने पुढे जायला सांगितले. गिदोनाने विचारले की हे कसे शक्य आहे कारण त्याला असे वाटत होते कि तो हे कार्य करण्यासाठी खूप लहान आहे. तुम्ही कधी स्वतःबद्दल असा विचार केला आहे का कि, "मी एक लहान मुलगा आहे! मी काय करू शकतो?” परंतु देव तुमच्यातील थोडी शक्ती घेऊ शकतो आणि काहीतरी मोठे करण्यास तुमची मदत करू शकतो. देव इतका बलवान आहे की त्याला एका शक्तिशाली व्यक्तीची गरज नाही. गिदोनाने असे काहीतरी केले जे आपण करू शकतो: त्याने पुष्टी केली, बझने देखील आजच्या गोष्टीत तसेच केले. देवाची इच्छा आहे कि आपण त्याच्या वचनाचे पुष्टीकरण करू आणि त्यानंतर त्याचे पालन करू. देवाला जर कोणत्या गोष्टीमुळे निराशा होत असेल तर ते आहे, निरादर आणि विश्वास न ठेवणे. जेव्हा गिदोनाला समजले की त्याचा सोबत एक देवदूत बोलत आहे तेव्हा तो घाबरला. देव त्याला म्हणाला, "शांत हो! भयभीत होऊ नको." येशूने म्हटले की तो आम्हाला शांतता देतो आणि नेहमीच आपल्याबरोबर असतो आणि आपल्याला भयभीत होऊ देत नाही. जेव्हा आपल्याकडे शांती येते, जेव्हा आपण जाणतो की देव आपल्याबरोबर आहे, आणि जेव्हा त्याने त्याच्या शब्दांची पुष्टी केली असते, तेव्हा आपण आपला विश्वास कृतीत आणतो आणि त्याचे पालन करतो. गिदोनाने आपल्या शहरातील

खोट्या देवांसाठी बांधलेल्या वेद्या खाली पाडल्या आणि खऱ्या देवासाठी वेदी बांधली. मग देवाने त्याला मोठ्या मिद्यानी सैन्या बरोबर लढण्यासाठी इस्त्राएल देशाला एकत्र आणण्यासाठी सांगितले. पुन्हा, गिदोनाने पुष्टी मागितली, त्याने एका अशक्य गोष्टीची मागणी केली. त्याने जमिनीवर लोकर कातरले. सकाळी तो भिजत होता पण त्याच्या सभोवतालची जमीन कोरडी होती. दुसऱ्या दिवशी, लोकर कोरडे होते पण त्याच्या सभोवताली जमीन ओली होती. गिदोनाने 32,000 इस्राएली लोकांना एकत्र केले परंतु देवाला आपल्या सामर्थ्यामध्ये स्वारस्य नाही; तो अगदी थोडे असले तरी सुद्धा त्यातून आम्हाला वाचवू शकतो. त्याने गिदोनाला सांगितले की, फक्त 300 माणसं असे पर्यंत इतर लोकांना घरी पाठव! डोळे बंद करू विशाल सेने समोर 300 लोकांची कल्पना करा. देवाने पुन्हा त्याच्या वचनाची पुष्टी केली. त्याने गिदोनाला शत्रूच्या तळाच्या बाजूला हळूच जायला लावले, तिथे त्याने तंबूत कोणाला तरी बोलतांना ऐकले की त्याला स्वप्न पडले की गिदोनाने त्यांना पराभूत केले. जेव्हा देव तुमच्या बरोबर आहे हे तुम्ही पाहता तेव्हा गिदोनाने जे केले ते करा आणि देवाची आराधना करा. गिदोनाने 300 लोकांना मशाली, मडके आणि तुता-या दिल्या. मध्य रात्री त्यांनी शत्रूला वेढा घातला. एकत्र त्यांनी मडके फोडले जेणे करून मशाली दिसतील आणि त्यांनी तुता-या वाजविल्या व मोठयाने ओरडले. मोठी सेना घाबरून पळून गेली! इस्त्राएलने सहज युध्द जिंकले, कारण देव त्यांच्या बरोबर होता. जेव्हा देव तुम्हाला बोलावितो तेव्हा तो किती शक्तिशाली आहे ते लक्षात ठेवा. त्याला पुष्टी मागा, आणि मग ज्या गोष्टीसाठी तो तुम्हाला बोलावित आहे ती करा.

मी देवाला त्याच्या वचनाची पुष्टी करण्याची मागणी करू शकतो. मी देवाची आज्ञा पाळिल.

## निर्णय 3

काही महिन्या नंतर मंडळीत पाळक देवाच्या वतीने बोलले आणि जे त्यांनी आधी सांगितले तेच त्यांनी पुन्हा सांगितले. त्याला तेव्हा देवाच्या वचनाची पुष्टी मिळाली आणि तो स्वतःला संगीतात तयार करू लागला.



## कृती 3

**रोजनिशी**

- कागदं वापरून रोजनिशी किंवा लहान वही तयार करा.
- त्यांना सांगा देवाच्या अस्तित्वाची पुष्टी करणारी साक्ष ते रोज त्यात लिहितील. जे त्यांच्याशी घडेल ते ते असेल किंवा असे काही जे ते पाहतील जे हे सिध्द करेल की देव आहे.




## काल रेखा 3

गिदोन कोणत्या वर्षी जन्मला? आपल्याला नेमके माहित नाही परंतू असे मानले जाते की तो ख्रिस्त पूर्व 1252 मध्ये जन्मला.

गिदोन केव्हा मरण पावला? आपल्याला नेमके माहित नाही परंतू असे मानले जाते की तो ख्रिस्त पूर्व 1152 मध्ये मरण पावला.

## कोडे उत्तर 3

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दे | र | क | र | भ | न | दो | गि | त्ति |
| व | [illegible] | म | जो | र | दे | तु | क | र |
| भू | लो | - | ज | बू | व | भ | दे | तु |
| र | त्ति | क | ली | बू | दू | व | नी | ता |
| त्ति | डी | भ | ओ | ळ | त | या | बू | - |
| भ | पु | र | म | दे | मि | ली | भ | या |
| तु | दे | ली | को | त | - | पु | ष्टी | व |
| वे | - | आ | ज्ञा | पा | ळ | णे | ळ | पु |
| र | द | बू | त्ति | म | त | शा | दे | वे |
| भ | ळ | या | व | - | ती | तु | क | दि |






## प्रश्न आणि उत्तर 3


**(मोठ्या मुलांसाठी)**

1. जर देवाने मला नाही म्हटले तर? (हे आपल्या सर्वांसोबतच घडते की जेव्हा आपल्याला काही तरी खूपच हवे असते, म्हणून जेव्हा आपल्याला वाटते की त्याचे उत्तर नाही आहे तेव्हा आपण पुष्टीसाठी देवाला वारंवार विचारतो. देव आपल्या संबंधी धीर धरतो, परंतू आपण ही वास्तविकता स्वीकारली पाहिजे की उत्तर नाही आहे आणि त्याची आज्ञा पाळली पाहिजे.)
2. देव माझ्यावर रागावतो का? का? कोणत्या प्रसंगी देव रागावतो? (जेव्हा आपण आज्ञा पाळत नाही आणि ते लपविण्यासाठी खोटे बोलतो, जेव्हा आपण इतर काही तरी करण्या एवढा संशय घेतो किंवा इतके कारणं सांगतो की आपण ते करू शकत नाही. जेव्हा आपण घाबरतो आणि त्याच्या वचना पुष्टी करण्यासाठी त्याला मागतो तेव्हा देव रागवत नाही.)

3. देव माझ्या बरोबर खरंच बोलू इच्छितो काय? (विषायावर चर्चा कराः देव काय म्हणेल, तो कोणाशी बोलू इच्छितो, जेव्हा तो आपल्याशी बोलतो तेव्हा इ. समारोप करा की तो आपल्या सर्वांशी दिवसभर कशाही विषयी बोलतो.)


## खेळ 3

**ओळखा कोण**



दोन संघ तयार करा. एका संघातील एक मुल मागील धडयातील एक चरित्र दाखवेल जे त्याला शिक्षकाने गुप्तपणे सांगितले. दुसरा संघ तो कोणते चरित्र आहे हे ओळखण्याचा प्रयत्न करेल. ते त्या चरित्रा बद्दल विशिष्ट प्रश्न विचारतील आणि उत्तर देणारा होय किंवा नाही एवढेच उत्तर देईल. कोणीही खोटे बोलणार नाही. उदा. जर मोशेचे चरित्र आहे तर प्रश्न असेल, 'तू तारू तयार केले काय?' उत्तर नाही असेल. 'तुझे नाव काय?' असा सरळ प्रश्न असू शकत नाही. जेव्हा त्यांचा अंदाज पक्का होईल तेव्हा ओळखणारा संघ चरित्राचे नाव सांगेल. जेव्हा संपेल तेव्हा संघ भूमिका बदलतील आणि पुन्हा खेळतील.

## हजेरी 3




वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्सिाहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहेः

**गिदोन**

## गृहपाठ 3

हया आठवडयाचा गृहपाठ हा आहे की देवाच्या अस्तित्वाची पुष्टी करणा-या गोष्टी पहा, जे घडते ते किंवा जे तुम्ही तुमच्या जीवनात पाहता किंवा इतर कोणच्या जीवनात पाहता ते. त्या बद्दल लिहा किंवा वहीत घरी चित्र काढा, आणि मग त्याबद्दल मंडळीत तुमच्या शिक्षकांना सांगा.

**वाचा**

दिवस 1: शास्ते 10:6-14

दिवस 2: शास्ते 10:15-11:3

दिवस 3: शास्ते 11:4-13

दिवस 4: शास्ते 11:28-34

दिवस 5: शास्ते 11:35-40

# 4. देव तुमची किंमत करतो



**पवित्र शास्त्रातील गोष्टः इफताह**

शास्ते 10:6-11:13, 11:29-40

## पाठांतर वचन 4

“पाहा, देव समर्थ आहे तरी तो कोणाला तुच्छ मानत नाही; त्याचे ज्ञानबल प्रचंड आहे.” ईयोब 36:5

## आवश्यकता गोष्ट 4



टॅफीला दररोज शाळेत वाईट वाटत असे. तिला सर्वजण तिच्या कुटुंबामूळे चिडवत असत, किंवा हया मूळे कारण ती ख्रिस्ती होती. ती नेहमी दुपारच्या जेवणासाठी एकटी बसत असे. तिला चांगला चेंडू खेळता येत नव्हता म्हणून खेळाच्या वर्गात जेव्हा इतर सर्व मुलं संघ निवडत असत तेव्हा ती सर्वात शेवटी निवडल्या जाई. ती तिच्या बरोबरच्या इतर मुलांना सांगत असे कि ते चेंडू खेळण्यात किती चांगले आहेत, परंतू ते फक्त तिच्यावर हसायचे आणि तिला सांगायचे कि ती खेळण्यात किती वाईट आहे. बरेचदा ते तिच्याकडे दुर्लक्ष करीत असत. एक दिवशी ती खूप आजारी होती आणि शाळेला जावू शकली नाही. परंतू जेव्हा ती बरी झाली तेव्हा ती परत शाळेला जाण्यासाठी घाबरत होती कारण तिला रोज चिडविले जाणार होते. तिने प्रार्थना केली, ‘देवबापा, कृपा करून माझी मदत कर!’

## मुख्य धडा 4

विश्वासाचे वीर हयात पुन्हा एकदा स्वागत आहे! आज आपण शिकणार आहोत की देव कशाला महत्व देतो. एका मिनिटासाठी लोक कोणकोणत्या गोष्टीला महत्व देतात त्याचा विचार करा, वेगवेगळया गोष्टी ज्या जीवनात व्यक्तिचा मान वाढवितात. जग काय म्हणतं कि कोणत्या गोष्टी व्यक्तिला अधिक महत्वपूर्ण बनवितात. वेगवेळे उत्तरं घ्या. जग आपल्याला नेहमी सांगत असते की पैसा, क्षमता( आजच्या टॅफीच्या गोष्टी प्रमाणे) गुण, कुटुंब, पाश्र्वभूमि, कातडीचा रंग, केस, कपडे, आणि चांगले दात पहा! जग लोकांना वेगवेगळे महत्व देते, काहींना अधिक मान तर काहींना कमी मान देते. परंतू देव हया गोष्टींकडे पाहत नाही. तुम्हाला काय वाटते कि देव काय पाहतो? मुलांना अंदाज लावू दया, परंतू तुम्ही उत्तर देवू नका. आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्ट पाहूया.

पुन्हा एकदा इस्त्राएल लोकांनी एकमेव ख-या देवाला सोडून इतर देवांची पूजा केली. मग पलिष्टी व अम्मोनी लोकांनी त्यांच्यावर 18 वर्ष जाच जुलुम केले. देवाने त्यांना सोडवावे म्हणून त्यांनी त्याच्याकडे विनंती केली आणि त्यांनी त्यांच्या देशातून विदेशी देव काढून टाकले. देवाने त्यांची प्रार्थना ऐकली आणि त्यांना सोडविण्यासाठी कोणाला तरी पाठविले. इस्त्राएलला कोणता मनुष्य सोडवू शकत होता. तुम्ही विचार कराल की तो मनुष्य मोठया पदावरील योध्दा असेल आणि सर्वाना प्रिय आणि सर्वांचा सन्मान प्राप्त करणारा असेल... परंतू देवाने ज्याला निवडिले त्याचे नाव इफताह होते, एका वेश्येचा पुत्र. जगाला वाटले कि तो महत्वाचा नाही, ते त्याला चिडवत आणि त्याच्या स्वतःच्या

भावांनी त्याला हाकलले कारण त्याची आई वेश्या हाती. हे अयोग्य होते- त्याने जे केले नाही त्यामूळे त्याच्या बरोबर अयोग्य वागणूक केली जात होती! येशुला सुध्दा माहीत आहे ते कसे असते. यहूदी पुढा-यांनी येशूची थट्टा केली, त्याचा अपमान केला आणि त्याने काही चूक केली नसतांना त्याला जिवे मारले. देव काय पाहतो. पवित्र शास्त्र सांगते जसे जग पाहते तसे देव बाहेरचे स्वरूप पाहत नाही. देव हदय पाहतो (1 शमुवेल 16:7) येशू म्हणाला मनुष्याने सर्व जग मिळविले (सन्मान, पैसे, महत्व इ) परंतू आपला आत्मा गमाविला तर त्याला काय लाभ. (मत्तय 16:26) तुमचा आत्मा संपूर्ण जगापेक्षा महत्वाचा आहे! जेव्हा येशू मरण पावला, तेव्हा त्याने ते हयासाठी केले कारण तो तुमची तेवढी किंमत करतो. जगातील कोणतेही स्थान देव तुमची किती किंमत करतो हयातून काही काढून घेवू शकत नाही किंवा त्यात भर घालू शकत नाही. तुमच्या उजवी व डावी कडच्या व्यक्तिकडे पहा. जी प्रत्येक व्यक्ति तुम्ही पाहता ती संपूर्ण जगापेक्षा महत्वाची आहे. आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टीमध्ये देवाने लोकांचे मन बदलविले. जेव्हा संकटात होते तेव्हा ज्या इफताहला त्यांनी दुर केले होते त्याच्याकडे जाऊन त्यांनी मदत मागितली. त्याने इस्त्राएल लोकांचे विजयी होण्यात नेतृत्व केले आणि तो 6 वर्ष इस्त्राएलचा पुढारी होता.

मला माहित आहे कि देवाचे मत सर्वात महत्वाचे आहे. देव माझी किंमत करतो हे मला माहित आहे.

## निर्णय 4



जेव्हा टॅफी शाळेत गेली, तेव्हा तिला आश्चर्य मिळाले. ती परत आली म्हणून इतर मुलं आनंदी होते! ‘आम्हाला तुझी आठवण येत होती’ ते म्हणाले. ‘तुझ्या शिवाय मजा येत नाही. तू आम्हा सर्वांना नेहमी प्रोत्साहन देतेस.’ त्यानंतर ती वर्गामधली खेळासाठी निवडली जाणारी शेवटची व्यक्ति राहीली नाही, जरी ती अजूनही चांगली खेळत नव्हती तरी.

## कृती 4

**तुमचा हात काढा**




मुलांना ए 4 किंवा पत्राच्या कागदावर किंवा त्यांच्या वहीत त्यांच्या हाताचे चित्र काढायला सांगा. प्रत्येक बोटावर त्यांनी देवाने त्यांना जे दयावे त्याचे चित्र काढावे किंवा त्याचे नाव लिहावे, जसे एखादे बक्षिस किंवा दुस-या व्यक्तिसाठी विनंती.

## काल रेखा 4

इफताह कोणत्या साली जन्माला? आपल्याला नक्की माहित नाही, परंतू असे मानले जाते की तो ख्रिस्त पूर्व 1118 मध्ये जन्मला. इफताह केव्हा मरण पावला? आपल्याला नक्की माहित नाही, परंतू असे मानले जाते की तो ख्रिस्त पूर्व 1094 मध्ये मरण पावला.

## कोडे उत्तर 4

किंमत कृती मध्ये, लक्षात ठेवा कि देव प्रत्येक व्यक्तिच्या आत्म्याची किंमत संपूर्ण जगा पेक्षा अधिक मानतो (मत्तय 16:26 ) आणि तो लोकांमध्ये भेद भाव करत नाही (मत्तय 22:16, गलती 3:28 ) प्रत्येक व्यक्तिसाठी अधिकतम किंमत किंवा उत्तर 10 आहे.




| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | ह | ता | फ | इ | दे | गं | मू | गा |
| ष्टी | मू | प | वि | त्र | शा | स्त्र | जा | क |
| मू | णे | क | वा | मू | ल्य | ष्टी | वि | इ |
| र्ती | ल्य | ती | म | खा | अ | दे | म | ना |
| म | दे | प्रि | वि | व | दे | वि | ज | य |
| ष्टी | गं | इ | णे | त | शा | अ | गं | क |
| लि | शा | मू | द | स्ता | व | मू | ल्य | ष्टी |
| प | गं | म | त | क | र | णे | व | अ |
| ष्टी | स्ता | वि | दे | व | गं | इ | मो | मू |
| क | अ | शा | ल्य | दे | म | नी | शा | अ |



## प्रश्न आणि उत्तर 4

**(मोठ्या मुलांसाठी)**


1. तुमच्या वर्गात किंवा शाळेत तुम्ही भेदभावाचे कोणते प्रसंग पाहिले आहेत? (त्यांनी पाहिलेल्या वेगवेगळया प्रसंगाबद्दल चर्चा करण्यास त्यांना प्रोत्साहन दया, कि कशा प्रकारे ज्या व्यक्ति सोबत भेदभाव होतो त्याच्या साठी ते चांगले नाही किंवा त्याने त्याला त्रासा होतो.)
2. जेव्हा मी भेदभाव पाहतो तेव्हा मी त्यात का पडवे (चर्चा करा कि जेव्हा कोणाला तरी तुमची गरज असते तेव्हा काहीच न बोलणे किंवा काहीच न करणे हया पेक्षा वाईट काहीच नाही)
3. ते मला एकटं का सोडत नाहीत? ( मानव हे सामजिक आहेत आणि लवकरच आपण भेदभावाच्या चुकांमध्ये सापडतो, इतरांपेक्षा अधिक प्रसिध्द होणे, आणि आपण पापात पडतो. लोक आपल्याला शांतीने

राहू देणार नाहीत. आपण स्वतःचे व इतरांचे संरक्षण करणे शिकलो पाहिजे. प्रभूमध्ये आपण कोण आहोत हे जाणून इतर काय म्हणतात हया कडे लक्ष न देता आपण स्थिर राहिलो पाहिजे)

## खेळ 4

**एकमेकांना महत्व देणे**

मुलं गोलात एकमेकांचे हात धरतात. तुम्ही मुलांना मुलीपासून वेगळे करू शकता आणि ते एकाच वेळी खेळतील. एक मुल वर्तुळाच्या बाहेर राहिल आणि गोल धावेल. तो उभ्या असलेल्या पैकी एक मुल निवडेल आणि त्याच्या पाठीला हात लावेल आणि तो विरूध्द दिशेने पळेल व त्याची जागा घेतली जाणार नाही. जो कोणी जागेवर पहिले पोहचेल तो जिंकेल. जो जिंकेल तो हरलेल्याचा एक चांगला गुण सांगेल उदा. मनुएल खूप हुशार आहे.



## हजेरी 4




वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्साहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहेः
**कविता पुस्तकं**

## गृहपाठ 4

हया आठवडयाचा गृहपाठ स्व-परिक्षण आहेः तुम्ही स्वतःला कसे पाहता? इतरां बरोबर स्वतःची तुलना करण्यासंबंधी सतर्क राहा. जर तुम्हाला कमी किंमतीचे वाटते तर लक्षात ठेवा कि देवाने तुम्हाला तुम्ही जसे आहात तसे ठेवले आहे आणि तो तुमची किंमत करतो आणि तुमच्यावर प्रिती करतो. जर तुम्हाला गर्व वाटत असेल तर, लक्षात ठेवा कि तुमचा भरवसा स्वतःमध्ये नाही तर येशूमध्ये आहे. हया आठवडयात दररोज मोठयाने म्हणा,‘ मी येशूचा आहे आणि तो मला महत्व देतो व माझ्यावर प्रिती करतो.”

**वाचा**

दिवस 1: शास्ते 13:1-5
दिवस 2: शास्ते 15:9-16
दिवस 3: शास्ते 16:4-10
दिवस 4: शास्ते 16:15-22
दिवस 5: शास्ते 16:23-30

# 5. बारकाई



**पवित्र शास्त्रातील गोष्टः शमशोन**

शास्ते 13:1-25, 14:5-6, 15:9-20, 16:2-31

## पाठांतर वचन 5

“तर मग आपल्यावर दया व्हावी आणि ऐन वेळी साहाय्यासाठी कृपा मिळावी, म्हणून आपण धैर्याने कृपेच्या राजासनाजवळ जाऊ.” इब्री लोकांस पत्र 4:16

## आवश्यकता गोष्ट 5



टॅफीचे आईवडील सकाळी कामाला गेले, ते तिच्या सोबत बोलले आणि त्यांनी तिला सांगितले की शेगडीवर ठेवलेले जेवण फ्रीज मध्ये ठेवायला विसरू नकोस. ‘आम्ही तुला केवळ एवढेच करायला लावणार आहे आणि तू चांगली वाग.’ टॅफीला वाटले,‘मला आणखी कोणतीच जवाबदारी देण्यात आली नाही हे किती विचीत्र आहे. मला जे पाहिजे ते मी करू शकते.’ टॅफी वर्तमानपत्र वाचायला गेली आणि आईवडीलांनी जे सांगितले ते नंतर करण्यासचा तिने विचार केला, परंतू ती वाचण्यात इतकी गुंग झाली की ती दिलेले काम करायला विसरली.

## मुख्य धडा 5

पुन्हा एकदा स्वागत आहे! आज आपण एका असाधारण वीराबद्दल शिकणार आहोत. एक दिवशी देवदूत एका मुल बाळ नसलेल्या जोडप्याकडे आला आणि त्याने त्यांना सांगितले की त्यांना मुलगा होईल. तो विशेष अभिवचन असलेला देवाला समर्पित नाझीर होईल. त्याने द्राक्षरसाला स्पर्श करू नये, कुठल्याही शवाला स्पर्श करू नये किंवा त्याच्या संपूर्ण आयुष्य भर त्याने त्याचे केस कापू नये. नाझीराचे अभिवाचन आपले देवाबरोबरचे जीवन हयाचे चित्र आहे, जे आज आपण करतो त्यामूळे नव्हे तर हया मूळे की येशूने नियम पूर्ण केला. परंतू देव बदलला नाही, तो आजही बारकाईकडे लक्ष देता. जो पर्यंत शमशोनाने वचन पाळले, तो पर्यंत देवाने अलौकिक सामर्थ्य दिले. एका दिवशी एक सिंह त्याच्यावर हल्ला करण्यासाठी आला, आणि त्याने त्याच्या हातांनी हया सिंहाला फाडून टाकले! दुस-या एका वेळेस इस्त्राल्यांनी त्याला पलिष्टयांच्या हातात दिले. शमशोनाने त्याच्या हाताला बांधलेल्या नविन दो-या तोडून टाकल्या, आणि एक जाभडे घेतले आणि एकटयाने 1000 पलिष्टी मारले. आणखी एका वेळेस पलिष्टयांनी नगरास वेढा घातला. शमशोनाने नगराचे दारं आणि भिंतीवरच्या सलाखी उचलून डोंगरावर नेल्या. शमशोनाच्या शक्तिवर विजय प्राप्त करण्यासाठी पलिष्टी काहीच करू शकत नव्हते. त्याच रितीने आपल्या ठायी देवाचे सामर्थ्य आहे आणि आपला शत्रू सैतान जिंकू शकत नाही. नंतर शमशोन दलिला नावाच्या एका पलिष्टी स्त्रीच्या प्रेमात पडला. तीने त्याला त्याच्या शक्तिचे रहस्य सांगण्यासाठी तो पर्यंत भाग पाडले जो वर त्याने त्याच्या केसांबद्दल सांगितले नाही. जेव्हा तिने त्याचे केस कापले तेव्हा त्याची शक्ति गेली होती! पलिष्टयांनी त्याला पकडले, त्याचे डोळे फोडले आणि

त्याला तुरूंगात टाकले. देव बारकाई कडे लक्ष देतो. आपण आपल्या जीवनात चर्चला जावू शकतो परंतू आपण बारकाईकडे लक्ष देत नाही. ते आजच्या गोष्टीतील टॅफी सारखे आज्ञा न पाळणे किंवा आपल्या आईवडीलां विरूध्द बंड असू शकतं जे आपण लपविण्याचा प्रयत्न करित आहोत. तो कोणातरी विरूध्द राग असू शकतो. ते काहीही असले तरी तुम्ही देवाकडून काहीच लपवू शकत नाही. जेव्हा ते काय आहे हे तुम्हाला कळते तेव्हा त्या बद्दल पश्चाताप करा, आणि देव तुम्हाला तुमची शक्ति परत देईल. काही दिवसांनी शमशोनाचे केस परत वाढले. एका मोठया सणाच्या वेळेस पलिष्यांनी पुन्हा एकदा शमशोनाची थट्टा करण्यासाठी त्याला आणले. त्याने देवाला विनंती केली की त्याने एकदा शेवटच्या वेळेस त्याला शक्ति दयावी, त्याने मंदीराचे दोन खांब हालविले आणि पूर्ण इमारत कोसळली. त्याच्या मरणाच्या वेळी त्याने तो जीवंत होता त्या पेक्षा अधिक पलिष्टयांना मारले. त्याच प्रकारे येशू हया पृथ्वीवर देवाच्या सामर्थ्याने चालला - त्याला कोणीही थांबवू शकत नव्हते. जरी शमशोनाने ब-याच चुका केल्या होत्या तरी, येशूने मात्र एकदाही चूक केली नाही. शमशोनासारखा येशूने जेव्हा तो वधस्तंभावर मेला आणि पुन्हा उठला तेव्हा त्याने पापवर आणि सैतानावर विजय मिळविला. येशू मुळे जेव्हा आपण शमशोनासारख्या चुका करतो तेव्हा आपल्याला कृपा मिळते. येशू आपल्या बरोबर आहे आणि त्याच्यासाठी कसे जगावे हे तो आपल्याला शिकविल, त्याच्या मागे जाणे म्हणजे सर्व बारकाईकडे लक्ष देणे आहे.

मी बारकाईने देवाचे अनुसरण करील.




## निर्णय 5

जेव्हा टॅफीचे आईवडील परत आले तेव्हा त्यांनी त्यांच्याबरोबर पाहुणे आणले. त्यांना आश्चर्य वाटले की जे जेवण तयार केलेले होते ते खराब झाले होते.

## कृती 5

**नविन संधी**



एका कागदाचे दोन भाग करण्यासाठी एक रेष काढा. पहिल्या भागात तुम्ही ज्या परिस्थितीत तुम्ही चुकला ते लिहाल. आणि दुस-या भागात तुम्ही देव तुम्हाला आणखी संधी कशी देईल आणि तुम्ही कशा रितीने परिस्थिती बदलाल ते लिहू शकता.

## काल रेखा 5

शमशोन कोणत्या वर्षी जन्मला? आपल्याला नेमके माहित नाही परंतू असे मानले जाते की तो ख्रिस्त पूर्व 1119 मध्ये जन्मला. शमशोन केला मरण पावला? आपल्याला नेमके माहित नाही परंतू असे मानले जात की तो ख्रिस्त पूर्व 1079 मध्ये जन्मला.

## कोडे उत्तर 5

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | शो | ल | ष्टी | लि | प | जा | न | र |
| दो | जा | अ | भि | व | च | न | ल | ड |
| त | श | स | ड | दो | शो | श | दा | स |
| दू | र | न | दू | म | अ | ल | शो | र |
| व | ड | अ | श | जा | र | मू | दो | झी |
| दे | च | भा | णू | स | क्ति | शो | ड | ना |
| ड | स | दो | जा | श | च | र | सिं | झी |
| के | र | श | ल | दो | न | द | जा | ह |
| न | फ | स | व | णू | क | णू | लि | न |
| श | स | क्ति | श | दू | ड | शो | च | ला |

### खरे की खोटे?

जर उत्तर खरे असेल तर लहिा खोटे असेल तर लहिा

1. शमशोनाची शक्ता त्याच्या हृदयात होती

2. दलीलाने शमशोनाला फसवलि आणा त्याला पलष्ट्यिांच्या हाती दलि.

3. मंदीर कोसळले तेव्हा अनेक पलष्टिी मेले परंतू शमशोन जीवंत राहलिा.

4. त्याच्या केसा वनिाही शमशोन शक्तशिाली होता.

5. शमशोनाने गाढवाच्या जाभडाने हजार माणसे मारले.



## प्रश्न आणि उत्तर 5

**(मोठ्या मुलांसाठी)**

1. मी माझ्या इच्छेनुसार वागू शकतो का? (जर आपल्याला येशूचा मान राखायचा आहे तर आपण त्याच्या इच्छेनुसार वागले पाहिजे. तारण मोफत असले तरी, शेवटी आपण आपल्या जीवनाच्या सर्व बारीक सारीक गोष्टीसह स्वतःला पूर्णपणे देवाला समर्पित करीत आहोत)

2. चांगले लोक स्वर्गात जातात नाही का? ( चांगले असणे किंवा येशूच्या चांगूलपणाला आपल्या पापांची क्षमा करू देणे हया बद्दल चर्चा करा. कोणीही पूरेशा प्रमाणात चांगला नाही)

3. मी देवावर भरवसा का ठेवावा? (केवळ देवच आहे की ज्याच्यावर आपण भरवसा ठेवू शकतो. आपण वडील, पाळक, आणि शिक्षक सुध्दा वेळो वेळी आपल्याला दगा देतील. त्याने दु:ख होते, परंतू सरते शेवटी आपल्याला आपला भरवसा केवळ देवावर ठेवायचा आहे.)

## खेळ 5

**लक्ष देणे**



मुलं गोल बसतात, आणि कोणी तरी मधे उभं राहून हे शोधण्याचा प्रयत्न करेल की पुढारी कोण आहे. मधे उभ्या असलेल्या मुलांला कळू न देता पुढारी निवडला जातो. निवडलेला पुढारी एखादी कृती सारखी सारखी करतो आणि इतर मुलं त्याची नकल करतील, असे की मधल्या मुलाला कळू नये की कृती कोण सुरू करत आहे. कृती साधी असू शकते, डोक्याला हात मारणे, नाकाला किंवा कानाला हात लावणे इ. जेव्हा मधे उभी असलेली व्यक्ति ओळखेल कि पुढारी कोण आहे तेव्हा ते आपसात जागा बदलतील आणि खेळ पुन्हा खेळतील.

## हजेरी 5

वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्सिाहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहे:
**शमशोन**

## गृहपाठ 5




हया आठवडयात तुमचा गृहपाठ हा आहे की तुमच्या जीवनाच्या बारीक सारीक गोष्टींकडे लक्ष दया. तुम्ही तुमच्या आईवडीलांची आज्ञा पाळत आहात का? इतर लोकांबरोबर तुमचे पटते का? तुम्ही सगळयांची क्षमा केली काय? तुमच्या अधिका-यांकडून तुम्ही काही लपवित आहात का? (आईवडील, शिक्षक, पाळक इ) तुम्ही कमी असलेली गोष्ट निवडा आणि देवाला क्षमा मागा आणि त्याला मदत मागा, अधिका-या कडे ते कबूल करा आणि त्याच्या बद्दल पश्चाताप करा. त्या गोष्टी बद्दल उरलेल्या आठवडयात योग्य ती गोष्ट करण्याच्या बाबतीत सावध असा.

**वाचा**

दिवस 1: रूथ 1:1-17
दिवस 2: रूथ 2:1-4
दिवस 3: रूथ 2:1-4
दिवस 4: रूथ 2:19-23
दिवस 5: रूथ 4:9-15

# 6. देव तुम्हाला आर्शिवाद देतो



**पवित्र शास्त्रातील गोष्टः रूथ**

रूथ 1:1-3:3, 3:16-4:22

## पाठांतर वचन 6

“जो पुरुष परमेश्वरावर भाव ठेवतो, ज्याचा भावविषय परमेश्वर आहे तो धन्य! तो जलाशयाजवळ लावलेल्या वृक्षासारखा होईल, तो आपली मुळे नदीकिनारी पसरील; उन्हाची झळई येते तिला तो भिणार नाही, त्याची पाने हिरवी राहतील; अवर्षणाच्या वर्षी त्याला चिंता पडणार नाही, तो फळे देण्याचे सोडणार नाही.” यिर्मया 17:7-8

## आवश्यकता गोष्ट 6



आज शाळेत कॅमेटच्या शिक्षकाने सर्व गटासमोर एक प्रस्ताव मांडला.‘माझा प्रस्ताव आहे की तुम्ही सर्वांनी दररोज वर्गानंतर थांबून मला वर्ग स्वच्छ करण्यासाठी आणि सामान व्यवस्थित करण्यासाठी मदत करावी. आपण लवकर संपवूण लगेच घरी जावू शकतो. जर सर्वांनी मला मदत केली तर सेमिस्टरच्या शेवटी मी त्यांना बक्षीस देईल.’ कॅमेटसह सर्वांना ही कल्पना आवडली परंतू त्याच्यासाठी हे थोडे कठिण होते कारण तो सर्वात दुर राहत होता. सगळेजण थांबू लागले. काळी दिवसांनंतर त्यांना वाटले बक्षीस लहान असेल म्हणून थांबण्यात काही अर्थ नाही. परंतू कॅमेटने कोणत्याही गोष्टीसाठी शिक्षकांना मदत करणे थांबविले नाही. बक्षीसाची पर्वा न करता तो नेहमी हजर असे.

## मुख्य धडा 6

पुन्हा एकदा स्वागत आहे! इफताह आणि शमशोन सारख्या शास्त्यांच्या काळात आणखी एक सुंदर गोष्ट होती. दुष्काळा मूळे एका इस्त्राएली माणसाने त्याचे कुटुंब मवाब देशात हालविले. 10 वर्षाच्या आत वडील आणि दोन्ही पुत्र मरण पावले. आपण पापाने दुषित जगामध्ये राहतो, ख्रिस्ती व विधर्मी हयाच्या बरोबर वाईट गोष्टी होतच असतात. येशूने सांगितले की आपल्याला संकटं येतील परंतू तो कठिण प्रसंगात आपल्याबरोबर राहील. विधवा नामी तिच्या दोन सुना रूथ आणि अर्पा हयांच्या बरोबर इस्त्राएल देशाला परतली. परत जातांना तिने दोन्ही सुनांना मवाब देशातील त्याच्या घरी परत जायला सांगितले तिला वाटले की त्यांच्यासाठी ते ठिक राहिल. त्या एकमेकींवर प्रिती करीत होत्या आणि निरोप घेणे कठिण होते. अर्पा मवाब देशास परत गेली परंतू रूथ मात्र नामीशी विश्वासू राहिली व तिने म्हटले नामीचा देव व लोक रूथचा देव व लोक होतील. बेथलेहेमात घरी गेल्यावर नामी म्हणाली की तिचे जीवन कडू झाले होते. जेव्हा आपल्या सोबत काहीतरी वाईट घडते तेव्हा कडूपणा येणे सोपे आहे. परंतू रूथ नामी बरोबर विश्वासू राहिली आणि बवाजाच्या शेतात सरवा वेचण्याचे काम विश्वासूपणे करू लागली. मग जेव्हा तिच्या सासूने तिला काहीतरी करायला लावले तेव्हा तिने प्रश्न न विचारता त्याचे पालन केले. विश्वासूपणा, परिश्रम आणि आज्ञा पालन हे देवासाठी चांगले कपडे, केशभूषा, मेकअप किंवा दागिने हयापेक्षा अधिक महत्वाचे आहेत. बवाजाच्याही लक्षात आले आणि त्याने तिला तिच्या शेतात काम करत राहायला सांगितले कारण तो तिचे संरक्षण

करू शकत होता. तो कृपाळू व दिलदार होता त्याने तिला कामक-यांबरोबर दुपारच्या जेवणासाठी बोलाविले आणि तिला अधिक अन्न दिले. जेव्हा लग्न करण्याची वेळ आली तेव्हा बवाजाने देवाला संतोष होईल अशा रितीने सर्व गोष्टींची काळजी घेतली. शक्ति आणि देखणेपणा हया पेक्षा अधिक महत्वपूर्ण रित्या कृपाळूपणा, औदार्य आणि नितीमानपणा हा येशूला प्रगट करतो. पवित्र शास्त्र सांगते जेव्हा आपण प्रभू मध्ये आनंद करतो, जेव्हा आपण त्याला आपल्या जीवनात सर्वात महत्वपूर्ण आणि अद्भूत मानतो तेव्हा तो आपल्याला आपल्या मनाच्या इच्छा पूरवितो (स्तोत्र37:4) येशू म्हणतो तो आपल्याला भरपूर जीवन देण्यासाठी आला (योहान 10:10) येशू हे देखील म्हणाला की जेव्हा आपण त्याला सर्व काही देतो तेव्हा तो आपल्याला 100 पट परत करतो, काही हया जीवनात आणि काही स्वर्गात!(मत्तय 19:28-30) देव आपल्याला आर्शिवाद देवू इच्छितो. बवाज आणि रूथ ने लग्न केले आणि त्यांना एक लहान मुलगा झाला ज्याने नामीला आनंदित केले. कधी कधी देवाचे आपल्यासाठीचे आर्शिवाद इतरांची देखाल मदत करतात. बवाज आणि रूथ भविष्यात दावीद राजाचे आजी आजोबा झाले आणि पूढे येशू ख्रिस्ताचे पूर्वज झाले. तुमच्या जीवनात देवाचे आर्शिवाद भविष्यातील कुटुंबात किंवा तुम्हाला नेहमी हवा होता असा मित्र, एखादे यशस्वी काम किंवा देवाची सेवा करण्याची आधिक मोठी संधी अशा स्वरूपात येवू शकतात. पूढे आज आपण कॅमेटला आर्शिवाद मिळेल ते पाहू. देव तुमच्यावर प्रिती करतो हे दाखविण्यासाठी सर्व प्रकारच्या लहान लहान गोष्टींचा उपयोग करतो. देव तुम्हाला आर्शिवादीत करण्याची वाट पाहत आहे आणि तुम्ही कठीण असले तरी देवाला प्रथम स्थान देता आणि त्याच्यात आनंद मानता आणि त्याला आवडते अशा प्रकारे जगता तेव्हा देव तुम्हाला आर्शिवाद देण्यात आनंद मानतो.

मी विश्वास ठेवतो की देव मला आर्शिवाद देऊ इच्छितो. आणि काहीही झाले तरी त्याचे अनुसरण करण्याचा मी पूर्ण प्रयत्न करीन.

## निर्णय 6

तो दिवस आला आणि शिक्षकाने कॅमेटला आश्चर्य किंवा बक्षीस दिले कारण केवळ तोच दररोज थांबला. तुम्हाला काय वाटते की बक्षीस काय होते?



वाह, एक सायकल!!! कॅमेटसाठी ते मोठ बक्षीस होते, कारण तो आता घरी लवकर पोहचू शकत होता आणि तो ज्यास्त थकणार नाही.

## कृती 6

**आठवण**

खालील काम मुलांसाठी हे लक्षात ठेवण्यासाठी आहे की देवाने त्यांना कशाद्वारे आर्शिवादीत केले.

पत्राच्या आकाराचे किंवा ए 4 आकाराचा कागद घ्या आणि चित्रात दाखविल्याप्रमाणे तो घडी करा. काही जागा काढा जिथे ते चित्र टाकू किंवा काढू शकतील. जर घरी फोटो असेल तर तुम्ही तो लावण्यासाठी जागा कापू शकता. फोटो किंवा चित्र तुमच्या कुटुंबाचे किंवा तुमच्याकडे असलेली किंवा तुम्हाला एखादी वस्तू हयाचे असू शकते.

## काल रेखा 6

रूथची गोष्ट केव्हा घडली? उ. आपल्याकडे नेमकी वेळ नाही, परंतू असे मानल्याजाते कि ती ख्रिस्तपूर्व 1230 मध्ये घडली.

## कोडे उत्तर 6



## प्रश्न आणि उत्तर 6

**(मोठ्या मुलांसाठी)**


1. मग माझ्यासाठी काय आहे? (देव उदार आहे आणि त्याला आपल्याला आर्शिवाद दयायला आवडते. तुमचे सर्वात मोठे स्वप्न कोणते आहे. देव ते पूर्ण करतो की नाही हे पाहण्यासाठी काही वर्ष थांबा! तुमचे विद्यार्थी काय मागत आहे ते पाहण्यासाठी नीट लक्ष दया, नविन गाडी, नविन मोबाइल इ. नव्हे तर त्या पेक्षा अधिक चांगले आणि महत्वाचे काय असू शकते हयाचे स्वप्न पाहण्यासाठी त्यांना मदत करा.)
2. जर देव आपल्याला आर्शिवाद देऊ इच्छितो तर तो आपल्या बरोबर वाईट का होवू देतो? (आपण अशा जगात राहतो जिथे खूप पाप आहे आणि सर्वांबरोबरच वाईट गोष्टी होतात. आणखी, देव आपल्या शरीरापेक्षा हदयाची ज्यास्त काळजी करतो. आपला आत्मा आणि जीव हे अनंतकालीन आहे परंतू शरीर नाही. देव दुःख आणि कठिण प्रसंगांचा उपयोग आपले हृदय बदलण्यासाठी आणि पविपक्वता वाढविण्यासाठी करतो.)
3. मंडळीत सर्वजण, ‘देवबाप तुला आर्शिवाद देवो’ का म्हणतात? (ती सवय असू शकतो किंवा केवळ अभिवादन परंतू सर्वांना त्याची सवय झाली आहे तर त्यात भाग का घेवू नये?)

## खेळ 6

**अर्शिवादांची छांटनी**

एक जण विकणारा आणि दुसरी व्यक्ति विकत घेणारी आणि इतर सर्व आर्शिवाद असू शकता. शिक्षक मुलांना आर्शिवादांचे नावं देतील (खाली उदाहरणं पहा) जेव्हा विकत घेणारा येईल तेव्हा तो म्हणेलः मला आर्शिवाद पाहिजे. विकणारा म्हणेलः तु कोणता आर्शिवाद शोधत आहेस? आणि हया यादीतून तू आर्शिवाद निवडू शकतोस. विकत घेणारा विचारेल त्याची किंमत किती आहे? जर तो आर्शिवाद आहे तर तो आर्शिवाद असलेला मुलगा किंवा मुलगी त्याचे वय मोठयाने सांगेल आणि पकडला जावू नये म्हणून तो धावू लागेल. विकत घेणारी व्यक्ति तितक्यांदा टाळी वाजवून विकणा-याला किंमत मोजून देईल आणि मग दोघेही मिळून त्या आर्शिवादाच्या मुलाला पकडण्यासाठी त्याच्या मागे धावतील. जर तो पकडला गेला तर तो मुलगा हारेल आणि जर नाही तर तो पुन्हा खेळात परत येईल आणि त्याला दुसरे नाव मिळेल. आर्शिवाद असे असू शकतोः

1. जेवण
2. तारण
3. आरोग्य
4. हॅमबर्गर
5. कपडे
6. गोड पदार्थ
7. केक
8. खेळणी
9. शांती
10. ज्ञान
11. आनंद
12. कुटुंब
13. प्रिती
14. मित्र
15. सार्वकालिक जिवन



## हजेरी 6

वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्साहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहेः

**रुथ**




## गृहपाठ 6

हया आठवडी तुमचा गृहपाठ अशा गोष्टीचा विचार करणे आहे जे तुमच्या कडे आहे आणि ते तुम्हाला आवडते, उदा. तुमचे कुटुंब, मित्र, तुमचे घर किंवा बिछाना, शाळेतील तुमचा आवडता वर्ग इ. हया आठवडयात दररोज त्यासाठी देवाचे आभार माना.

**वाचा**

दिवस 1: 1 शमुवेल 1:1-8

दिवस 2: 1 शमुवेल 1:9-20

दिवस 3: 1 शमुवेल 3:1-6

दिवस 4: 1 शमुवेल 3:7-14

दिवस 5: 1 शमुवेल 3:15-21

# 7. देव तुमची भर्ती करतो



**पवित्र शास्त्रातील गोष्टः शमुवेल**

1 शमुवेल 1:1-28, 3:1-21

## पाठांतर वचन 7

“तुम्ही मला निवडले नाही, तर मी तुम्हांला निवडले व तुम्हांला नेमले आहे; ह्यात हेतू हा की, तुम्ही जाऊन फळ द्यावे, तुमचे फळ टिकावे आणि जे काही तुम्ही माझ्या नावाने पित्याजवळ मागाल ते त्याने तुम्हांला द्यावे.” योहान 15:16

## आवश्यकतेची गोष्ट 7



कॅमेटच्या चर्च मध्ये ते सुट्टीतील पवित्र शास्त्र शिक्षण शाळा घेणार आहेत. सर्व मुलांना नाटक व इतर गोष्टी करण्यासाठी एकत्र करण्यात आले. सगळयांना त्यांच्या रविवार शाळेच्या शिक्षकांनी करण्यासाठी काहीतरी दिले परंतू कॅमेटला कशातही भाग नव्हती. तो दुःखी झाला आणि त्याने विचार केला कि तो काही कामाचा नाही, आणि देव त्याचा उपयोग करत नाही किंवा तो करणार नाही.

## मुख्य धडा 7

विश्वासाचे विर मध्ये पुन्हा एकदा स्वागत आहे! आज आपण शमुलवेलाबद्दल शिकणार आहोत, इस्त्राएलचा शेवटचा शास्ता की देवाने त्याला कसे बोलाविले. आपण विश्वासाच्या सर्व स्त्री व पुरूषांबद्दल जे शिकलो ते आठवते का? शमुवेल कशा प्रकारचा व्यक्ति होता असे तुम्हाला वाटतेः महान योध्दा, श्रिमंत पुरूष की एक याजक? देवाने त्याला कसे बोलाविले ते पाहू या. एका इस्त्राएली स्त्रीला मुलबाळ होत नव्हते आणि त्यामूळे ती खूप दुःखी होती. एकदा जेव्हा ती तिच्या पती बरोबर देवाच्या मंदीरात आराधना करण्यासाठी गेली तेव्हा ती शांतपणे देवाकडे बाळासाठी प्रार्थना करत होती, ती म्हणाली की ती ते बाळ देवाला देईल. ती घरी गेल्यावर देवाने तिची प्रार्थना एकली आणि तिला शमुलवेल नावाचा एक मुलगा झाला. तिने शमुवेलाला मंदिरात परत आणले आणि तो एलीबरोबर तिथे वाढला व त्याची काळजी घेऊ लागला. एक दिवस, जेव्हा शमुवेल लहान मुलगाच होता तेव्हा तो मंदीराच्या आत झोपत होता व दिव्यांची काळजी घेत होता. रात्रीच्या वेळी कोणी तरी त्याला शमुवेला शमुवेला अशी हाक मारत आहे असे त्याला ऐकू आले. तो उठला आणि एलीकडे धावत गेला आणि म्हणाला, मी इथे आहे. परंतू एलीने त्याला हाक मारली नव्हती. तीन वेळे नंतर एलीच्या लक्षात आले की देव त्याला हाक मारत आहे. त्याने शमुलवेलाला परत जाऊन देवाचे म्हणणे ऐकायला सांगितले. पुन्हा देवाने त्याला हाक मारली तेव्हा शमुवेल त्याला म्हणाला, ‘ मी इथे आहे.’ जेव्हा देवाला त्याच्या राज्यासाठी अद्भूत गोष्टी करायच्या असतात तेव्हा आपण विचार करतो कि देव देवदूतांचा उपयोग करील किंवा खाली येऊन मोठया आवाजात बोलेल. देवाने हया दोन्ही गोष्टी केल्या आहेत, परंतू ब-याच वेळेस देव तुमच्या आणि माझ्या सारख्या साधारण लोकांचा उपयोग करतो! देव केवळ पाळक, मिशनरी, किंवा शिक्षकांचा उपयोग करू इच्छित नाही. देव तुमचाही उपयोग करू इच्छितो, लहान मुल असूनही जिथं तुम्ही आहात

तिथ! नंतर आपण पाहू की आधीच्या गोष्टीमध्ये देवाने कॅमेटची निवड कशी केली. येशूने म्हटले की त्याची मेंढरे (तुम्ही) त्याची वाणी ओळखतात. (योहान 10:27) देवाने शमुवेलासारखे तुम्हाला बोलवावे म्हणून तुम्ही तयार असण्यासाठी मंडळीत वेळ घालवा आणि जिथे कुठे तुम्ही मदत करू शकता तिथे मदत करा. तुमच्या आईवडीलांना, शिक्षकांना आणि पाळकांचा सल्ला घ्या जेणे करून ते देवाची वाणी ओळखण्यासाठी तुम्हाला मदत करू शकतील. मग जेव्हा देव तुम्हाला बोलावेल तेव्हा तुम्ही म्हणू शकता 'मी इथे आहे.' आणि जे काही तो तुम्हाला करायला लावेल ते करू शकता. शमुवेलाला देवाकडून संदेश मिळाल्यानंतर तो रात्रभर झोपला आणि सकाळी त्याने एलीला सांगितले. उदा. जर देव तुम्हाला एखादया हॉटेलमध्ये जेवणाच्या मधात बोलावितो तर सर्व लोक जे करत आहेत ते करणे थांबवू नका हयासाठी कि तुम्ही अधिक आत्मिक सिध्द व्हावे. स्वतः बाजूला जा आणि संडासात जाऊन प्रार्थना करा. हे विनोदास्पद वाटते परंतू देव तुमच्या बरोबर कुठेही बोलू शकतो. मग तुम्ही परत येऊन योग्य वेळेस तुमच्या आई वडीलांना किंवा शिक्षकांना ते सांगू शकता. शमुवेलाने त्याच्या उरवरित जीवनात देवाचे वचन विश्वासूपणे सांगितले. तो इस्त्राएलाचा शेवटचा शास्ता होता आणि देवाने त्याचा उपयोग इस्त्राएलच्या पहिल्या दोन राजांचा अभिषेक करण्यासाठी केला.

जेव्हा देव मला बोलावेल तेव्हा तयार राहण्याची मी निवड करतो.

## निर्णय 7



तो केवळ ऐकण्यासाठी सुट्टीतील शास्त्र शाळेत गेला. परंतू एका दिवशी त्याने व्हीबीएस ला आलेल्या मुलाला रडतांना ऐकले कि कोणालाही तो नको होता. कॅमेट देवाच्या वचनासंबंधी बोलू लागला आणि त्याला सांगितले कि देव त्याच्यावर प्रिती करत होता आणि देव नेहमी त्याच्याबरोबर होता. कॅमेटने त्याला चर्च मध्ये आमंत्रित केले आणि तेव्हा पासून तो मुलगा आणि त्याची आई हयांनी चर्चला येणे कधी थांबविले नाही. त्याठिकाणी कॅमेटच्या लक्षात आले कि देवाची इच्छा आहे कि त्याने त्याच्या सैन्याचा भाग व्हावे.

## कृती 7

**बोलावणे**




एका कागदावर लिहा कि देव सेवा करण्यासाठी तुम्हाला कसे बोलावित आहे असे तुम्हाला वाटते किंवा तुमच्या वयात किंवा परिस्थितीत देव तुम्हाल कसे बोलाविल. उदा. पवित्र शास्त्रातून बोलण्यासाठी, शिकविण्यासाठी, मंडळीच्या कृतीक्रमात मदत करण्यासाठी, रडणा-या किंवा जो म्हणतो त्याला किंमत नाही किंवा जो म्हणतो त्याला त्याचे जीवन आवडत नाही अशा शाळेतील मित्राला मदत करण्यासाठी.

## काल रेखा 7

शमुवेलाने कोणत्या वर्षी इस्त्राएलचे नेतृत्व करणे सुरू केले? उ. आपल्याला नेमके वर्ष माहित नाही परंतू असे मानले जाते कि त्याने ख्रिस्त पूर्व 1143 मध्ये नेतृत्व करणे सुरू केले.
शमुवेल केव्हा मरण पावला? उ. आपल्याला नेमके वर्ष माहित नाही परंतू असे मानले जाते कि तो ख्रिस्त पूर्व 1055 मध्ये मरण पावला.

## कोडे उत्तर 7

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | ली | क | ऐ | आ | त्र | सं | इ | व |
| इ | आ | ज्ञा | पा | ळ | रा | ज | दे | ऐ |
| व | क | वा | ऐ | सं | व | ऐ | क | श |
| आ | दे | णे | ज | ल | क | त्र | सं | मु |
| ल | ऐ | झो | ली | णे | पा | दे | ज | वे |
| ए | ली | श | प | ज | ष्टा | दे | सं | ल |
| स्त्रा | ज | सं | ल | णे | इ | ऐ | आ | णे |
| इ | व | आ | वा | ज | दे | णे | ल | स्ता |
| ज | सू | श्वा | वि | क | ज | सं | शा | सू |





## प्रश्न आणि उत्तर 7

**(मोठ्या मुलांसाठी)**


1. परंतू मी काय फरक पाडू शकतो? (एखादी व्यक्ति काय प्राप्त करू शकते हे अद्भूत आहे. जरी आपण लहान दिसत असले तरी आपण बरंच काही करू शकतो. मोठे आकडे थोडया वेळासाठी विसरणे मदतीचे ठरते, लाखो लोक उपाशी आहेत, परंतू केवळ एकावर लक्ष केंद्रित करा. तुमच्या जवळ कोणी आहे का ज्याला गरज आहे? एका व्यक्तिला मदत केल्याने आपल्याला सुरवात करण्यासाठी मदत होते.....नंतर दुसरी.......मग दुसरी. आणि लवकरच तुम्ही मोठया फरकाचा भाग व्हाल.)

2. जगातील सर्वांसाठी पूरेसे जेवण किंवा पैसा का नाही? (तुमच्या विद्यार्थ्यांना परिस्थितीचा विचार करण्यासाठी मदत करा. कदाचीत देवाची इच्छा आहे की आपण इतरां बरोबर वाटून घेणे शिकावे? कदाचित आदामाबरोबर जे पाप जगात शिरले त्याचा तो भाग आहे.)
3. जर कोणी माझा राग करतो ते काय? (आपण सर्वांचे मित्र होणार नाही, परंतू देव आपल्याला आपल्या शत्रूंचीही मदत करण्यासाठी सांगतो. कोणास ठाऊक? कदाचीत प्रत्येक व्यक्तिसाठी देवाकडे मोठी योजना आहे आणि तो तुमचा उपयोग करण्याची योजना करत आहे.)

## खेळ 7

**लांडगा आणि मेंढरं**

मुलं हात धरून वर्तुळ तयार करतात. एका मुलाला लांडगा करा आणि दुस-याला मेंढरू. मेंढरू वर्तुळाच्या आत राहिल आणि लांडगा बाहेर, हात धरून असलेले मुलं लांडग्याला मेंढरू धरू देणार नाहीत. लांडगा हाताच्या वरून, खालून किंवा साखळी तोडून वर्तुळाच्या आत जाऊन मेंढराला पकडण्याचा प्रयत्न करेल. जी जोडी तुटेल किंवा लांडगयाला आत किंवा बाहेर जावू देईल ती वर्तुळ सोडेल. मेंढरू आणि लांडगा दोन्ही वर्तुळाच्या आत किंवा बोहर जावू शकतो.






## हजेरी 7

वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्साहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहेः

**शमुवेल**

## गृहपाठ 7

हया आठवडयाचा गृहपाठ आहे कि दररोज काहीतरी दयाळू करावे, उदा. रास्ता ओलांडण्यासाठी वयस्कर व्यक्तिला मदत करणे, मोठया व्यक्तिला दुकानातून पिशव्या नेण्यासाठी मदत करणे, शाळेत दुस-या मुलाला गृहपाठ करण्यासाठी मदत करणे इ. पुढील वर्गात शिक्षकाला तुमच्या कृती बद्दल सांगा.

**वाचा**

दिवस 1: 1 शमुवेल 5:1-6
दिवस 2: 1 शमुवेल 5:7-12
दिवस 3: 1 शमुवेल 6:1-6
दिवस 4: 1 शमुवेल 6:7-12
दिवस 5: 1 शमुवेल 6:13-16,7:1

# 8. देव सर्व समर्थ आहे



**पवित्र शास्त्रातील गोष्टः कराराचा कोश**

1 शमुवेल 4:1-11, 5:1-6:21

## पाठांतर वचन 8

“कारण तुमचा देव परमेश्वर हा देवाधिदेव, प्रभूंचा प्रभू, महान, पराक्रमी व भययोग्य देव असून तो कोणाचा पक्षपात करत नाही किंवा लाच घेत नाही.” अनुवाद 10:17

## आवश्यकता गोष्ट 8



एक दिवस किप एका मित्राबराबर चर्चमध्ये होता आणि त्याच्या मित्राचे डोके दुखत होते म्हणून तो रडत होता. त्याची डोके दुखी बरी व्हावी म्हणून किपने त्याच्यासाठी प्रार्थना करण्याचा विचार केला. त्याने थोडया वेळासाठी प्रार्थना केली आणि तुम्हाला काय वाटते की काय झाले असेल?

त्याच्या मित्राचे आता डोकं दुखत नव्हते! त्या दिवसापासून किपला वाटले कि त्याला रोग्यांना बरे करण्याचे सामर्थ्य आहे आणि तो हे विसरला की त्याने बरे केले नाही तर देवाने बरे केले होते. तो काय करू शकतो हयाबद्दल त्याने त्याच्या शाळेतील मित्रांसमोर फुशारकी मारली.

## मुख्य धडा 8

मगील आठवडी आपण शिकलो कि अद्भूत गोष्टी करण्यासाठी देवाला लोकांचा उपयोग करणे आवडते. हया आठवडी आपण शिकू की त्याला लोकांची गरज नाही. जुन्या काळाला कोश म्हटलेल्या मोठया सोनेरी पेटीच्या वर देव इस्त्राएल लोकांच्या मध्ये राहत होता. कोशाच्या आता दहा आज्ञांच्या दगी पाटया, अहरोनाची काठी आणि मान्ना किंवा स्वर्गातील भाकर जी इस्त्राएल लोकांनी वाळवंटात खाल्ली त्याचे भांडे होते. मागील आठवडयात आपण शिकलो देवाने शमुलवेलाला बोलाविल्यानंतर, इस्त्राएल लोक पलिष्टयांबरोबर मोठया युध्दात होते. इस्त्राएल लोक पहिली लढाई हारले, म्हणून त्यांनी त्याच्या बरोबर कोश आणला आणि हा विचार केला की ते नक्कीच जिंकतील कारण देव त्यांच्या बरोबर आहे. कधी कधी आपल्याला वाटते की देवाने आपल्याला पाहिजे ते केले पाहिजे ज्या रितीने आधीच्या गोष्टीत किपला वाटले. परंतू देव एका शिशीत निर्देशाची वाट पाहत नाही. देव सर्व समर्थ आहे, सर्वत्र आहे आणि सर्वकाही जाणतो, आणि तो त्याचे स्वतःचे उद्देश पूर्ण करील. लढाईच्या दुस-या दिवशी इस्त्राएली सेना हारली आणि पलिष्टयांनी कोश हस्तगत केला. इस्त्राएली घाबरले. कधी कधी आपण देवाच्या प्रतिष्ठेची चिंता करतो, परंतू देव मोठा आहे आणि तो त्याची काळजी घेवू शकतो. पलिष्टयांनी कोश घेतला आणि मंदीरात त्यांच्या मूर्तीच्या पायाजवळ ठेवला. सकाळी मूर्ती कोशापूढे उपडी पडली होती! त्यांनी तिला उभे केली, परंतू दुस-या दिवशी सकाळी ती पुन्हा पडली आणि तिचे डोके व हात तुटले होते. आणि शहरामध्ये गळवे फुटले. देव सर्व समर्थ आहे आणि त्याची स्वतःची लढाई लढू शकतो. पलिष्टयांनी तीन वेगवेगळया शहरांमध्ये कोश आणला आणि प्रत्येक ठिकाणी गळवे फुटले. मग त्यांनी तो कोश एका गाडीवर काही सोने व काही गायीं हयाच्याबरोबर स्वतःहून इस्त्राएल लोकांकडे परत

आणला. देव लोकांच्या मदतीशिवाय गायींचे नेतृत्व करत होता. जेव्हा कोश इस्त्राएल देशात आला तेव्हा लोकांनी आनंद केला परंतू काही मरण पावले कारण त्यांनी उगीच कोशाच्या आत पाहिले. येशू म्हणाला आपण केवळ एकाच व्यक्तिचे भय धरले पाहिजे आणि तो म्हणजे देव- परंतू देव आपला पिता सुध्दा आहे जो आपल्या बद्दल सर्व बारकाई जाणतो, आपल्या डोक्यावरील केसांबद्दल सुध्दा. तो आपल्यावर प्रिती करतो आणि आपली काळजी घेईल. आपण कधीही कशाचसाठी चिंता करू नये. जुन्या काळात देवाचे सानिध्य कोश म्हटलेल्या पेटीवर केंद्रित होता. आता येशूमूळे देवाचे सानिध्य आपल्या मनात भरले आहे (1 करिंथ 6:19) येशूने कोशामधील गोष्टींची काळजी घेतली - येशूने त्या पाटयांसारखे नियम पूर्ण केले, अहरोनची काठी प्रतिनिधित्व करते त्या प्रमाणे तो आपला स्थायी याजक आहे, आणि तो स्वर्गातील मान्न्यासारखा आपली रोजची आत्मिक भाकर आहे. तुमच्या मनाकडे बोट दाखवा. जेव्हा तुम्ही येशूवर विश्वास ठेवता तेव्हा तुम्ही देवाच्या कोशा सारखे होता! आपल सर्व समर्थ देव येऊन तुमच्या मध्ये राहतो आणि जिथं तुम्ही जाता तिथं तुमच्या बरोबर जातो.

मी विश्वास ठेवतो की देव सर्व समर्थ आहे आणि मी त्याचे भय धरेल. मी येशूला माझा राजा बनविण्याची आणि त्याच्या वर विश्वास ठेवण्याची आणि कशाही बद्दल चिंता न करण्याची निवड करतो.

## निर्णय 8



एका दिवशी त्याच्या वर्गातील मुलाच्या कानात दुखत होते. किपने त्याला सांगितले की तो त्याच्यासाठी प्रार्थना करेल आणि ते लगेच बरे होईल. किपने त्याच्यासाठी प्रार्थना केली परंतू काहीच झाले नाही. किपला त्याच्या बद्दल संकोच वाटला, तो त्याच्या रविवार शाळा शिक्षकांबरोबर बोलला आणि त्याला सांगितले कि काय झाले, त्याच्या शिक्षकाने त्याला समजावून सांगितले की सामर्थ्य केवळ देवाकडून प्राप्त होते.

## कृती 8

**वचनं**

प्रत्येक मुलाला खाली दाखविल्या प्रमाणे 5 रकाणे असलेला कागद दया. कागद कापा आणि दररोजचे वचन त्यावर लिहा जे देवाचे सामर्थ्य आणि सानिध्य हया बद्दल बोलते, जसे स्तोत्र 23:7, मार्क 10:27 इ.


| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## काल रेखा 8

पलिष्ट्यांनी कोणत्या वर्षी कोश हस्तगत केला? उ. आपल्याकडे नेमके वर्ष नाही, परंतू असा विचार केला जातो की ते ख्रिस्त पूर्व 1142 मध्ये घडले.

## कोडे उत्तर 8

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टी | भर | ड | य | द | हृ | आ | णे | ळ |
| पे | स | र्व | स | म | र्थ | पे | ष्टी | ष्टी |
| हृ | ष्टी | ळ | ग | णे | दे | लि | ग | सा |
| गा | डी | ग | आ | हृ | प | य | ड | व |
| ई | मा | चिं | ळ | ठी | भर | मा | ता | भर |
| णे | ठी | ड | पे | वे | टी | ठी | चिं | दे |
| दे | न्ना | ष्टी | दे | य | का | गा | पे | ड |
| मा | गा | आ | ज्ञा | मो | ड | णे | श | ग |
| भर | ज्ञा | ग | ड | व | दे | ष्टी | ळ | को |





## प्रश्न उत्तर 8

**(मोठ्या मुलांसाठी)**

1. इतका सामर्थ्यशाली व महान परमेश्वर माझा मित्र कसा असू शकतो? (देवाचे अनेक पैलू आहेत. आपण त्याचे भय धरले पाहिजे, परंतू हे जाणणे चांगले आहे कि तो आपल्यावर प्रिती करतो. पवित्र शास्त्र सांगते की आपल्या डोक्यावर किती केस आहेत हे देखील देवाला माहित आहे, त्याला लहानातील लहान बारकाई माहित आहे.)

2. देव दुर आहे असे मला का वाटते? (सुरवातीपासून देवासाठी विश्वास महत्वाचा होता. देवाची इच्छा आहेत की आपण त्याला पाहू शकत नसलो तरी त्याच्यावर विश्वास ठेवावा. कदाचीत हे त्याच्या हया निर्णयाचा भाग आहे की आपल्याला रोबोट बनवू नये, जेणे करून आपण विचार न करता केवळ जे योग्य तेच करावे. जर आपण देव जो आहे तसे त्याला पाहू शकलो तर, आपण सर्व त्याच्या पूढे गुडघे टेकू. कधी कधी असे वाटते की आपण देवाला पाहू

शकत नाही तो खूप दुर आहे, परंतू देव आपले हदय पाहू शकतो आणि हे पाहू शकतो की कोणाकडे खरंच विश्वास आहे.)

3. हे जग खरंच संपेल काय? (होय, असा समारोप करत, हया विषय बद्दल तुमच्या विद्यार्थ्यांशी बोला. जर आपण पवित्र शास्त्रावर खरंच विश्वास ठेवतो तर आपण विश्वास ठेवाला पाहिजे की हया जगाचा शेवट होणार आहे कारण आपल्याला ते माहित आहे.)

## खेळ 8



**गरम आलू**

सर्व विद्यार्थी गोल तयार करतात. जसे संगीत वाजविले जाते तसे मुलं गोलाकारात वस्तू पूढे देतात. जेव्हा संगीत थांबेल तेव्हा ज्याच्या हातात ती वस्तू राहिल तो देवाने त्याच्या जीवनात काय केले हया बद्दल साक्ष देईल. उदा. त्याला त्रास देणा-या मुलापासून देवाने त्याचे संरक्षण केले, किंवा देवाने अन्न, पैसा इ. पूरविळ

## हजेरी 8




वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्साहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहेः

**कराराचा कोश**

## गृहपाठ 8

हया आठवडयाचा तुमचा गृहपाठ हा आहे की तुम्ही रिकामी आग पेटी किंवा इतर डबा शोधावा. तुम्ही त्याला सजवू शकता. कागदाच्या तुकडयावर पवित्र शास्त्रातील वचन लिहा आणि त्या डबीत टाकून तुमच्या खिशात ठेवा. जेव्हा कधी तुम्हाला समस्या येईल, तेव्हा तुम्ही ते वचन वाचू शकता. मग देवाचे वचन तुमच्या जीवनात तुमची मदत करेल आणि तुमचे सांत्वन करेल. पुढील वर्गात लहान डबी वर्गात आणा आणि तुमच्या शिक्षकाला दाखवा.

**वाचा**

दिवस1: 1 शमुवेल 8:4-11,17-22
दिवस 2: 1 शमुवेल 9:1-9
दिवस 3: 1 शमुवेल 9:25-10:2
दिवस 4: 1 शमुवेल 10:9-11,17-25
दिवस 5: 1 शमुवेल 13: 1-14

# 9. देवाची इच्छा



**पवित्र शास्त्रातील गोष्टः शौल राजा**

1 शमुवेल 8:4-21, 9:15-10:1, 10:20-25, 13:5-14, 15:1-31

## पाठांतर वचन 9

“तुझ्या इच्छेप्रमाणे वागण्यास मला शिकव; कारण तू माझा देव आहेस; तुझा उत्तम आत्मा मला सरळ मार्गावर नेवो.” स्तोत्रसंहिता 143:10

## आवश्यकता गोष्ट 9



कीपला वाईट वाटतं कारण त्याचे वडील त्याला बाहेर जावू देत नाहीत आणि जर तो शेजारच्या मुलांबरोबर बाहेर खेळायाला गेला तर ते त्याला शिक्षा करतात. कीपला माहीत आहे की हया मुलांची वागणूक बरोबर नाही. मग एक दिवस कीप त्याच्या पाळकाशी बोलला, व म्हणाला की त्याला आता त्याच्या वडीलांची आज्ञा पाळायची नाही कारण ते वाईट मनुष्य आहेत. मग पाळकांनी त्याला विचारले, ‘तू असे का म्हणतोस,’ कीप म्हणाला, ‘ कारण ते मला बाहेर खेळू देत नाहीत आणि मला शिक्षा करतात.’

## मुख्य धडा 9

मागील आठवडी आपण शिकलो की देव सर्व समर्थ आहे आणि त्याच्या इच्छे प्रमाणे करण्याची त्याची योजना आहे. आज आपण शौल नावाच्या मनुष्याबद्दल शिकणार आहोत की जेव्हा आपण देवाची इच्छा बदलण्याचा प्रयत्न करतो किंवा त्याच्या इच्छेचे पालन करत नाही तेव्हा काय होते. त्या दिवसात इस्त्राएलकडे राजा नव्हता आणि शमुवेल अजूनही इस्त्राएलाचा पुढारी होता. इस्त्राएल लोक शमुवेलाकडे आले आणि इतर आजूबाजूच्या देशांप्रमाणे त्यांनी राजा मागितला. आपल्या शेजा-यांकडे जे आहे त्याच्याकडे पाहणे आपल्यासाठी सोपे आहे. जेव्हा आपण तुलना करतो तेव्हा देवाने आपल्याला जे दिले त्या बद्दल आपण असमाधानी होतो. इस्त्राएल लोकांनी देवाला गळ घातली की त्याने त्यांना राजा दयावा. देवाने त्यांना सांगितले की राजा मिळाल्यानंतर तुम्हाला ते आवडणार नाही आणि नंतर ते मागे फिरू शकणार नाहीत. देव आपल्यावर प्रिती करतो आणि त्याच्या मनात आपल्यासाठी उत्तम योजना असते, परंतू देवाला दुस-या कशातरी साठी जबरदस्ती करण्याचा मोह होतो. देव मानला आणि त्याने शमुवेलाला शौल नावाच्या मनुष्याला राजा म्हणून अभिषेक करण्यासासठी पाठविले. परंतू वेळ जात गेली तसा शौल थोडं थोडं करून देवाची आज्ञा मोडू लागला. आज्ञाभंग हळू शिरू शकतो, जसे आपण आजच्या आधीच्या गोष्टीत किप बद्दल पाहिले आणि आपण सावध असायला पाहिजे! येशूने म्हटले आपण मोहात पडू नये म्हणून सावध असा व प्रार्थना करा. (मत्तय 26:14) एका युध्दाच्या वेळेस शौलाला शमुवेलाची वाट पहायची होती की त्याने येऊन देवासाठी यज्ञ करावा, ज्याची परवांगी केवळ शमुवेलासारख्या लेवी लोकांनाच होती. त्यांनी एक आठवडा वाट पाहिली आणि नंतर अधीर झाले. शौलाला भिती वाटली की तो त्याचे सैन्य गमावेल- त्याला वाटले की युध्द जिंकण्यासाठी देवापेक्षा लोक ज्यास्त महत्वाचे होते. त्याने नियमाचे उल्लंघन केले आणि यज्ञ केला. शमुवेलाने त्याला सांगितले की राजा म्हणून त्याची जागा घेण्यासाठी

देव आधिच इतर कोणाला तरी शोधत होता. जर तुम्ही देवाची इच्छा पाळणे थांबविले तर देवाकडे तुमच्यासाठी जे अद्भूत आहे ते तुम्ही गमावाल. येशूने वधस्तंभावर जे केले त्यामूळे आपल्याला नेहमी मदत करण्यासाठी आपल्याकडे कृपा आहे. आज्ञा मोडण्यापेक्षा देवाला मदत मागा. काही वेळा नंतर देवाची आमालेकी लोकांचा नाश करण्याची आज्ञा मोडली आणि राजा आणि उत्तम मेंढरं व गुरंढोरं वाचवली. ते म्हणाले की ते देवासाठी यज्ञ होते, परंतू शमुवेल म्हणाला यज्ञापेक्षा आज्ञापालन बरे. आपल्याही जीवनात देवासाठी आपला वेळ, पैसा, दानं इ. देऊन यज्ञ करणे चांगले असले तरी. देव नेहमी आज्ञापालनाला प्राधान्य देतो. येशूने म्हटले जो देवाच्या इच्छे प्रमाणे वागतो तो त्याचा भाऊ व बहीन आहे. (मत्तय 12:20) येशू आणखी हेही म्हणाला की, भविष्य करणे, भूते घालविणे आणि चमत्कार करणे हयापेक्षा अधिक देव त्याची इच्छा पूर्ण करणे हया बद्दल पर्वा करतो. शौलाच्या आज्ञाभंगामूळे देव त्याच्या कडून राज्य घेऊन घेणार होता! शौलाच्या संपूर्ण जीवनभर त्याचा आज्ञाभंग अधिकाधिक वाढत गेला आणि शेवटी तो युध्दा मारला गेला. पुढील वेळी आपण शौलापेक्षा अधिक चांगल्या व्यक्तिबद्दल शिकणार आहोत ज्याने राजा म्हणून शौलाची जागा घेतली, जो काहीही झाले तरी जे योग्य ते करण्याबद्दल सावध होता.

मी देवाची आज्ञा पाळणे आणि त्याची इच्छा पूर्ण करणे आणि जे काही तो मला करायला सांगेल ते करण्याची निवड करतो.

## निर्णय 9



पाळक कीप बरोबर बोलले आणि त्याला सांगितले की त्याचे वडील नेहमी त्याच्यासाठी जे उत्तम त्याचा विचार करतात आणि त्याने त्यांची आज्ञा पाळली पाहिजे कारण देवाने त्यांना घरातील अधिकाराच्या जागी ठेवले आहे. कीपने पाळकांनी जे सांगितले त्याचा विचार करायला सुरवात केली आणि त्याच्या लक्षात आले की पाळक बरोबर आहेत, त्याचे वडील त्याच्यावर जे लोक वाईट प्रभाव करू शकतात त्यांच्यापासून त्याचा बचाव करत होते

## कृती 9

**आरसा**



ही कृती मुलांसाठी मोकळं होण्याची आहे जेणे करून त्यांना एकत्र होण्यास मदत होईल. कृतीः

1. कृतीच्या जवाबदार व्यक्तिने प्रत्येकाला जोडीत विभागावे.

2. प्रत्येक जोडीत दोन मुलं एकमेकांच्या पुढे उभे राहतील.

3. एक मुलगी किंवा मुलगी पुढील व्यक्तिच्या शारीरिक हालचालींचे आरश्यासारखे अनुकरण करण्याचा प्रयत्न करील मग तो अवयव कोणताही असला तरी.  तो हावभाव, हात पाय हालविणे इ.चे अनुकरण करील.

4. मग दुस-याने त्याच्या जोडीदाराचे अनुकरण करावे.


## काल रेखा 9

शौल कोणत्या वर्षी जन्मला? उ. आपल्याला नेमके माहित नाही, परंतू असे मानले जाते की तो ख्रिस्त पूर्व 1082 मध्ये जन्मला.

शौल कोणत्या वर्षी मरण पावला? उ. आपल्याला नेमके माहित नाही, परंतू असे मानले जाते की तो ख्रिस्त पूर्व 1010 मध्ये मरण पावला.

## कोडे उत्तरे9 9

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ड | रं | त्र | ता | र | ण | रं | श | ल | ड |
| प | वि | त्र | शा | स्त्र | ट | वा | त्र | वा | शौ |
| श्वा | वा | श | ल | न | ध | ट | प | ल | ल |
| ता | व | भ | ड | ज्ञ | त्र | पा | श्वा | रं | वे |
| प | श्वा | ध | रं | य | वा | ह | ड | ढ | मु |
| ट | र | तु | स्तं | ह | वे | पो | भ | में | श |
| प | शू | न | र | भ | ड | प | जा | ट | ड |
| ये | शा | ट | ल | मो | भ | श | रा | त्र | ना |
| ड | वा | आ | ज्ञा | पा | ल | न | न | ल | रं |
| श्वा | त्र | आ | प | रं | ट | ध | तु | शा | श |





## कोडे उत्तर 9

**(मोठ्या मुलांसाठी)**

1. जर देव मला जे अशक्य ते करायला लावेल तर? (अनेक वेळेस देव आपल्या जीवनात चमत्कार करू इच्छितो. देव आपल्याला जे सांगत आहे त्याची आज्ञा पाळून आपल्याला एक पाय दुस-या पायासमोर टाकायाची गरज आहे.)

2. देव कुठुन आला? (पवित्र शास्त्र सांगते देव नेहमीच होता. जग अस्तित्वात येण्याआधी, आपल्या आधी आणि आपल्याला माहीत आहे त्या आधी तो होता. देव आहे, तो नेहमी होता आणि तो नेहमी राहिल. देव सार्वकालीक आहे.)

3. सर्व लोक देवावर विश्वास का ठेवत नाहीत? (सैतान आपल्याला वेगवेगळया दिशांमध्ये देवापासून दूर ओढत नेतो. तुमच्या विद्यार्थ्यांबरोबर बोला की किती लोक म्हणतात की ते देवावर विश्वास ठेवतात, परंतू त्यांचे जीवन दाखवून देते की ते विश्वास ठेवत नाहीत. आपली कृती आपल्या विश्वासाबद्दल काय सांगते? )

## खेळ 9

**चेंडू चुकविणे**

धागा, रिबीन किंवा खुरच्याची रांग वापरून मुलांचे दोन गट मावतील असे चैकोन जमीनीवर तयार करा. प्रत्येक गटातील एक व्यक्तिची शूटर म्हणून निवड केली जाईल आणि चैकोनाच्या विरूध्द बाजूला उभे राहतील. खेळण्यासाठी, शूटर विरूध्द गटाच्या मुलांकडे त्यांना मारण्यासाठी चेंडू फेकेल आणि चैकोनातील मुलं तो चुकविण्याचा प्रयत्न करतील. ज्या मुलाला चेंडू लागेल तो चैकोन आणि खेळ सोडून बाहेर येईल. ज्या गटाच्या चैकोनात शेवटी ज्यास्त खेळाडू उरतील तो गट जिंकेल.



## हजेरी 9




वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्साहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहेः

**प्रमुख संदेष्टे**

## गृहपाठ 9

हया आठवडी तुमचा गृहपाठ हा असेल की प्रत्येक वेळेस जेव्हा तुम्ही मोहात पडाल तेव्हा देवाकडे प्रार्थना करा की त्याने तुम्हाला योग्य ते करण्यासाठी मदत करावी. जेव्हा तुम्ही पाप करता तेव्हा पश्चाताप करा आणि देवाला क्षमा मागा. आणखी हया आठडयात देवाने तुम्हाला चांगल्या गोष्टी करण्यासाठी मदत करावी म्हणून प्रार्थना करा प्रत्येक वेळेस जेव्हा तुम्ही काहीतरी चांगले करण्याचा विचार करता तेव्हा, उदा. कोणचीतरी मदत करणे किंवा कोणाला तरी प्रोत्साहन देणे.

**वाचा**

दिवस 1: 2 शमुवेल 11:1-13

दिवस 2: 2 शमुवेल 11:14-27

दिवस 3: 2 शमुवेल 12:1-10

दिवस 4: 2 शमुवेल 12:11-19

दिवस 5: 2 शमुवेल 12:20-25

# 10. देव आपल्याला शिक्षा करतो



**पवित्र शास्त्रातील गोष्टः दावीद राजा**

1 शमुवेल 16:1-13, 2 शमुवेल 5:1-5, 11:1-15, 12:1-23

## पाठांतर वचन 10

“पाहा, ईश्वर ज्याचे शासन करतो तो पुरुष धन्य! म्हणून सर्वसमर्थाचे शासन तुच्छ मानू नकोस.” ईयोब 5:17

## आवश्यकता गोष्ट 10



पेपीला माहित आहे की जे काही तिच्या मालकीचे नाही ते घेणे चूकीचे आहे आणि त्याने देवाला दुःख होते. रविवार शाळेत एक मुलगी आहे जी फरशीवर किंवा टेबलावर नेहमीच तिचे पैसे ठेवते. तिन आठवडे पर्यंत पेपीने ते पैसे घेण्याचा मोह टाळला. ती स्वतःशी विचार करत असे की,‘जर मी पैसे घेतले तर कोणाच्याच लक्षात येणार नाही- नाही, मी तसे करू नये.’ मग एका आठवडी ती मोहाला बळी पडली आणि तिने ते पैसे घेतले!’ पुढील रविवार शाळा वर्गात पेपीने एका दुस-या मुलाला कुणी पाहत नसतांना कोणाच्या तरी रंगकांडया घेतांना पहिले, तिला खूप राग आला आणि ती मोठयाने वर्गात ओरडली.‘हे! तु त्याच्या रंग कांडया घेतल्या! तुला माहित नाही काय की ते चुकीचे आहे?’ जरी त्या मुलाने क्षमा मागून त्या रंगकांडया परत केल्या तरी, पेपी वर्गाच्या वेळेस त्याबद्दल बोलत राहिली, शिक्षकांना सांगत, तिच्या आजू बाजूच्या मुलींकडे कुजबुज करत आणि त्या मुलाला वाकोल्या दाखविल्या व त्याला फार वाईट वाटले.

## मुख्य धडा 10

मागील आठवडी आपण शिकलो की कसा शौल राजा अधिकाधिक देवाची आज्ञा मोडत होता. आज आपण अशा कोणातरी बद्दल शिकणार आहोत ज्याच्या ठायी काही तरी विशेष होते. देवाने शमुवेलाला पुढच्या राजाला अभिषेक करण्यासाठी बेथलेहेमला पाठविले. शमुवेल सर्वात मोठया भावाला पाहून प्रभावित झाला. परंतू देवाने सांगितले की बाहेरचे स्वरूप् पाहू नको कारण देव हृदय पाहतो. देवाने सर्वात धाकटया किंवा लहान भावाला पुढचा राजा होण्यासाठी निवडले. जर तुम्हाला लहान किंवा अदृश्य असल्या सारखे वाटत असेल तर कधीच काळजी करू नका. देव नेहमी अशा लोकांच्या शोधात असतो ज्यांना तो हवा आहे. (स्तोत्र 14:2.) देव नेहमी तुम्हाला पाहिल. तुम्ही दावीदाकडून बरच काही शिकू शकता. तो महान योध्दा होता आणि तो शौल राजाला मारू शकला असता आणि सहज राज्य घेवू शकला असता. परंतू त्याने देवाच्या इच्छेचा मान केला आणि जे योग्य ते करण्याचा प्रयत्न केला. येशू म्हणाला जो कोणी आपला जीव राखू पाहील तो तो गमावेल, परंतू जो कोणी येशूसाठी आपला जीव देईल तो तो वाचवेल. (लूक 9:24.) दावीदाने त्याच्या राज्याचा दावा न करून जणू त्याचा जीव ‘गमाविला’, परंतू त्याला देवाला ते त्याला देऊ दिले. (फिलिप्पै 2:6-11) एकदा जेव्हा शौल राजा त्याला मारू पाहत होता तेव्हा दावीद काहीतरी विशेष बोललाः माझे

रक्त देवाच्या सानिध्यापासून दूर सांडू देऊ नका. (1 शमुवेल 26:20) दुस-या शब्दातः जरी तू मला जीवे मारले तरी, देवाबरोबर असणे हे माझ्या जीवापेक्षा माझ्यासाठी महत्वाचे आहे. देवाने दावीदाला माझ्या मनासारखा मनुष्य म्हटले. (1 शमुवेल 13:14,प्रेषित 13:22.) देवाने एखादयासाठी म्हणावी अशी किती ही महान गोष्ट! कोणीही परिपूर्ण नाही, आणि देव ज्याच्यावर प्रिती करतो त्याला शासनही करतो. (इब्री 12:6.) एक दिवस दावीदाने लग्न झालेली एक स्त्री बथशिबा हिला घेतले आणि तिच्या पतीला युध्दात मरण्यासाठी पाठविले. किती वाईट! देवाने नाथान संदेष्ट्याला त्याची निंदा करण्यासाठी पाठविले. त्याने त्याला एका गरीब माणसाची गोष्ट सांगितली ज्याच्याजवळ मोलवान कोकरू होते. शेजा-याने ते कोकरू घेतले आणि त्याच्या कडे अनेक मेंढरं असूनही ते खाल्ले. दावीदाला राग आला आणि तो म्हणाला हा मनुष्य मेला पाहिजे. अधीच्या गोष्टीत पेपी सारखे जेव्हा तुम्ही दुस-या कोणालातरी काहीतरी चूक करतांना पाहता तेव्हा तुम्हाला खूप राग येतो, ते हे दाखविते की तुम्ही सुध्दा तशाच गोष्टी बद्दल दोषी आहात. (रोम 2:1) देवाला विनंती करा की त्याने तुमचे हृदय तपासण्यासाठी व पश्चाताप करण्यासाठी तुमची मदत करावी. लक्षात ठेवा जेव्हा शौलाचा सामना केला गेला, तेव्हा तो त्याचा दोष मान्य करत नव्हता आणि अधिक वाईट झाला. परंतू जेव्हा दावीदाचा सामना केला गेला किंवा त्याचे दोष दाखविण्यात आले तेव्हा त्याने त्याची चूक कबूल केली आणि ती अधिक चांगली होण्याची पहिली पायरी होती. देवाची शिक्षा, त्याच्या व बथशबेच्या बाळाचा प्राण घेणे ही होती. दावीदाने भिक मागीतली की मुल जगावे. आपणही आपल्या पापांचे परिणाम थांबविण्यासाठी देवाला विनंती करू शकतो. कधी कधी तो तसे करेल परंतू कधी कधी आपल्याला व इतरांना शिकविण्यासाठी परिणाम उत्तम असतात. मुल मरण पावले, परंतू आशेविना नाही. देव त्याच्या कृपेमध्ये नेहमी पश्चतापाची व पुर्नबांधणीची जागा काहीतरी चांगले निर्माण करण्यासाठी वापरत असतो. दावीद व बथशेबेला शलमोन नावाचा आणखी एक मुलगा झाला. देवाने शलमोनावर प्रिती केली जो पुढचा राजा झाला आणि पूढे येशूचा वंशज.

मी हृदयावर लक्ष केंद्रित करून देवाची शिक्षा स्वीकारण्याचा निर्णय घेतो.

## निर्णय 10



वर्गाच्या शेवटी, पेपीने त्या मुलीला पाहिले जी शिक्षकां बरोबर तिचे हरवलेले पैसे शोधत होती. पेपीला खूप वाईट वाटले आणि तिच्या मनात तिला कळले की तिने जे केले ते तिने कबूल केले पाहिजे, परंतू तिला ज्यास्त वाईट हयाचे वाटले की तिने तसेच करणा-या मुलाला चिडविले. शेवटी ती ते सहन करू शकत नव्हती आणि तिने शिक्षकाकडे व त्या मुलीकडे तिने जे केले ते कबूल केले आणि पैसे परत केल. मग तिने त्या मुलाला रंगकांडयां बद्दल चिडविण्यासाठी क्षमा मागितली.

## कृती 10

**हृदय**



विद्यार्थी हदयाच्या आकाराचे बुक मार्क तयार करतील. तुम्ही जाड कागद वापरू शकता किंवा पांढरा कागद त्याला रंगवा किंवा लाल कागद घ्या.  तुम्ही त्याच्या वर प्लास्टिक सुध्दा लावू शकता किंवा टिकावू करण्यासाठी कॅन्टॅक्ट पेपर लावा. छिद्रतून रिबीन टाकून बो बांधा. हे बुक मार्क तुम्हाला ही आठवण ठेवण्यासाठी मदत करेल की देव ज्याच्यावर प्रिती करतो त्याला शिक्षाही करतो.


‘देव माझ्यावर प्रिती करतो म्हणून मला शिक्षा करतो.’

## काल रेखा 10

दावीद कोणत्या वर्षी जन्मला. उ. आपल्याला नेमके माहीत नाही परंतू असे मानले जाते की तो ख्रिस्तपूर्व 1040 मध्ये जन्मला. दावीद कोणत्या वर्षी मरण पावला? उ. आपल्याला नेमके माहित नाही परंतू असे मानले जाते की तो ख्रिस्त पूर्व  970 मध्ये जन्मला.

## कोडे उत्तर 10

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| द | न | रू | षे | क | षे | भि | अ | ळ | द |
| ळ | वी | आ | ज्ञा | पा | ल | न | र | य | था |
| द | थ | दा | था | व | था | वी | द | ळ | म |
| प | कृ | हे | दा | ना | ळ | ह | श्धा | न | हे |
| श्धा | पा | म | ल | हे | नि | रू | षे | बू | ल |
| ता | ळ | बू | श्धा | ब | थ | व | म | हे | थ |
| प | क | व | थ | द | न | था | ड | ळ | बे |
| हे | र | शे | ळ | बू | षे | र | दा | णे | र |
| न | [illegible] | हे | र | चे | स्व | रू | प | द | हे |
| षे | रू | ळ | थ | था | ळ | जा | रा | रू | न |





## प्रश्न आणि उत्तर 10

**(मोठ्या मुलांसाठी)**

1. देव संपूर्ण कुटुंब, शहर किंवा देश हयांना शिक्षा देतो असे होवू शकते काय? तुमच्याकडे उदाहरणं आहेत काय?

होय, पवित्र शास्त्र अनेकदा दाखविते की देव संपूर्ण शहराला शिक्षा देतो. उदा. देवाने सदोम आणि गमोराला शिक्षा केली. दुसरे उदाहरण आहे जेव्हा इस्त्राएल लोकांनी सिनाय वाळवंटात मूर्ती तयार केली आणि देव त्या सर्वांचा नाश करू इच्छित होता परंतू मोशेने कृपेची याचना केली आणि देवाने मन बदलले. मोशेने मूर्ती जाळली आणि सोन्याची बुकटी पाण्यात टाकली आणि लोकांनी ती शिक्षा म्हणून स्वीकारली! निर्गम 32. एकदा त्यांनी 3 हजार लोक मारले आणि दुस-या वेळेस देवाने त्यांच्यावर मरी आणली. शौलाचे सुध्दा उदाहरण आहे जेव्हा देवाने त्याच्या कडून व त्याच्या मुलांकडून राज्य घेवून घेतले. आपण आजकाल किंवा शहर किंवा कुटुंब हया बद्दल देखील बोलू शकतो. परंतू हे म्हणण्याबद्दल सावध असा की होणारी प्रत्येक वाईट गोष्ट शिक्षा आहे. येशूने घडलेल्या वाईट गोष्टीचे उदाहरण दिले आणि म्हटले कि ते लोकांच्या पापामूळे झाले नाही. (लूक 13:1-5) देव आपल्या बरोबर इतका चांगला आहे की आपण जरी वाईट कुटुंब किंवा वाईट शहर किंवा देशात असलो तरी कृपा मागू शकतो ........... आणि देव बरेचदा आपल्याला वाईट परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी मदत करतो.

2. तुम्ही प्राप्त केलेली शेवटची शिक्षा कोणती होती आणि का? तुमच्या अनुभवाबद्दल सांगा.
3. जे चूक करतात त्यांना शिक्षा करण्यासाठी जर पोलिस किंवा राजकीय नेते आहेत तर ते वाईट लोकांना वाईट का करू देतात आणि चांगल्या लोकांकडून पैसे का घेतात? (हया ठिकाणी कल्पना ही आहे की जगात असलेल्या अन्यायाबद्दल बोलावे आणि हया बद्दल की आपण अन्यायी जगात राहत असतांना केवळ देवच आपल्याला शांती देऊ शकतो. तुम्ही कोणत्या देशात किंवा क्षेत्रात आहात हयावर तपशील आधारित राहिल.)

## खेळ 10

**खरे की खोटे**

एक मुलगा किंवा मुलगी गटासमोर उभा राहून असे विधान करेल, 'योनाने तारू बांधले' आणि मुलं उत्तर देतील की ते खरे आणि की खोटे. जर त्यांना वाटते की ते खरे आहे तर ते अंगठा वर करतील आणि जर त्यांना वाटते की ते खोटे आहे तर ते अंगठा खाली करतील. शिक्षक खरे कि खोट ते सांगतील. जे चूक होते ते उठतील आणि गटाच्या सभोवती किंवा बसण्याच्या जागे भोवती एकदा धावतील, आणि परत आल्यावर जागा शोधण्याचा प्रयत्न करतील. ज्याच्या कडे जागा राहणार नाही तो पुढच्या फेरीसाठी वाक्य बोलणारा होईल.



## हजेरी 10

वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्साहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहेः

**दावीद**



## गृहपाठ 10

‘देव माझ्यावर प्रिती करतो म्हणून मला शिक्षा करतो’ हे वाक्य पाठ करा. जेव्हा तुमचे आईवडील किंवा शिक्षक तुम्ही केलेल्या चूकेसाठी तुम्हाला शिक्षा करतील तेव्हा ते वाक्य तुमच्या मनात बोलाः ‘देव माझ्यावार प्रिती करतो म्हणून मला शिक्षा करतो.’ जर तुम्ही स्वतःला असा विचार करतांना पाहिले की,‘ मी कधी काही चूक करत नाही! तसे करण्याची माझी इच्छा नव्हती!’ तर तुम्ही जे केले त्याकडे आणखी एकदा पहा आणि तुमच्या इच्छा ऐवजी तुमच्या ख-या कृती कडे लक्ष लावा. स्वतःचा बचाव न करता परिणाम स्वीकारा.

**वाचा**

दिवस 1: 1 राजे 5:1-5
दिवस 2: 1 राजे 6:1-2,14
दिवस 3: 1 राजे 7:48-51
दिवस 4: 1 राजे 8:22-26
दिवस 5: 1 राजे 8:27-30

# 11. देवाचे मंदीर



**पवित्र शास्त्रातील गोष्टः शलमोन राजा**

1 राजे 2:1-4, 3:4-15, 4:29-34, 6:1, 6:37-38, 8:1-8:30

## पाठांतर वचन 11

“तुम्ही देवाचे मंदिर आहात आणि तुमच्यामध्ये देवाचा आत्मा वास करतो हे तुम्हांला ठाऊक नाही काय?” करिंथकरांस पहिले पत्र 3:16



## आवश्यकता गोष्ट 11

बझला समजले की त्याचा एक मित्र सिगरेट पितो आणि त्याच्या मित्राने त्याला सिगरेट पिण्याचे आमंत्रण दिले......

## मुख्य धडा 11

मागच्या आठवडयातील दावीद राजा देवासाठी भव्य मंदीर बांधून देवाचा सन्मान करू इच्छित होता, परंतू दावीद एक योध्दा होता म्हणून तो ते बांधू शकला नाही. त्या ऐवजी देवाने त्याच्या वारीस ते बांधेल असे अभिवचन दिले आणि दोनदा ते अभिवचन पूर्ण केले. दावीदाचा मुलगा शलमोन इस्त्राएलाचा पुढचा राजा झाला. एका दिवशी त्याने देवाला हजार यज्ञ केले. (याकोब 4:8) म्हणते की जेव्हा आपण देवाजवळ येतो तेव्हा तो आपल्या जवळ येतो. रात्री देवाने शलमोनाला काहीही माग असे म्हटले. तुम्ही लाल रंगाची गाडी मागाल काय? सुंदर कपडे? त्या ऐवजी शलमोनाने त्याच्या लोकांची चांगली काळजी घेण्यासाठी ज्ञान मागीतले. वाह! देव इतका प्रभावित झाला कि त्याने शलमोनाला जिवंतांपैकी सर्वात ज्ञानी पुरूष केले आणि त्याला संपत्ती व यशही दिले. शलमोनाने विशाल मंदीर बांधले ज्याला आतून सुंदर कोरीव काम होते. सोन्याची खोली ज्यात माणसापेक्षा मोठया खांबांवर दिवे होते हयाची कल्पना करा. शलमोनाने सर्व इस्त्राएल लोकांसोबत समर्पणासाठी चैदा दिवसांचा कृतीक्रम केला. देवाचे गौरव दाट गडद ढगांसारखे मंदीरात आले. त्यांनी 22000 गुरे आणि 120,000 मेंढरे व बक-यांचा यज्ञ केला. शलमोनाने स्वतःसाठी नव्हे तर देवाच्या लोकांसाठी प्रार्थना केली.

आज ते मंदीर गेले आहे आणि दुसरे देखील, परंतू देवाने आणखी चांगले मंदीर देउन त्याचे अभिवचन पाळले आहे. हया पृथ्वीवर असतांना येशू म्हणाला की तो हे मंदीर नष्ट करून तीन दिवसात पुन्हा बांधेल. (योहान 2:19) तो भौतिक मंदीराबद्दल बोलत नव्हता परंतू आत्मिक बद्दल जे त्याचे मरण व पुनरूत्थान हयातून बांधले गेले. आज तुम्ही नवीन मंदीर पाहू शकता काय? होय, परंतू ते ही मंडळीची इमारत नाही. तुम्ही अनेक वचनी देवाचे मंदीर आहात! (इफिस 2:19-22) आपण ख्रिस्ती बांधकामाच्या विटांसारखे आहोत. देवाचा आत्मा आपल्या आत जगतो मंदीराच्या समर्पणाच्या वेळीच्या ढगांसारखं, आपण सर्व मिळून आत्मिक मंदीर तयार करतो जिथं देव सदासर्वकाळसाठी राहतो.

देव त्याची बांधणी करतच आहे आणि त्याला सुंदर बनवत आहे आणि तुम्हाला त्याची मदत करण्यासाठी आमंत्रित करीत आहे. जेव्हा तुम्ही तुमच्या वर्गातील मित्राला येशू बद्दल सांगता किंवा मंडळीत मदत करता तेव्हा तुम्ही त्याची बांधणी करण्यासाठी मदत करता. देवाचे मंदीर चांगल्या रितीने बांधण्यासाठी ज्ञानाची गरज आहे. शलमोनाचे ज्ञान इतके प्रसिध्द होते की शिबाची राणी त्याचे बोलणे ऐकायला दुरून आली, परंतू येशू शलमोना पेक्षा महान आहे. (मत्तय 12:42) येशू आपल्या ज्ञानाचा स्त्रोत आहे आणि आपण त्याला मागितले तर तो आपल्याला देईल. (याकोब 1:5) जेव्हा तुम्ही प्रत्येकाला इतर पापात टाकता तेव्हा तुम्ही विकृत आणि कमजोर बांधकाम करता. (1 करिंथ 3:10-15) जेव्हा तुम्ही एकमेकांना लोकांबरोबर कनवाळू व्हायला प्रोत्साहित करता तेव्हा तुम्ही ते सुंदर होण्यासाठी मदत करता. येशूने आपल्याला सांगितले की जशी त्याने आपल्यावर प्रिती केली तशी आपण एकमेकांवर प्रिती करावी. (योहान 13:34.) सोन्या सारखी ज्यारितीने आपण एकमेकांसोबत वागतो त्यात सौंदर्य आहे. येशूने म्हटले मंदीर सोन्याला पवित्र करते. (मत्तय 23:17) अविश्वासणा-यांकडे सोन्यासारखा कनवाळूपणा असेल, परंतू येशूवर विश्वास ठेवल्याने तुम्ही त्याच्या मंदीराचा भाग बनता.

इतरांवर प्रिती करून त्याच्या मंदीराची बांधणी करण्यासाठी देवाने माझी मदत करावी म्हणून मी देवाला ज्ञान मागेन.

## निर्णय 11



बझला माहीत होत की ते बरोबर नाही आणि तो म्हणाला, ‘मित्रा तसे करू नकोस. तू तुझ्या शरीराची काळजी घेतली पाहिजे कारण सिगरेट पिल्याने तुझ्या अवयवांना इजा होते आणि त्यामूळे तुझे आयुष्य कमी होते. आणखी तुझे शरीर हे पवित्र आत्म्यासाठी वेगळी केलेली जागा आहे. देव तुझ्या आत वस्ती करतो, आणि तू तुझ्या शरीराची काळजी घेतली पाहिजे आणि त्याचा अपमान करू नये.

## कृती 11

**मार्शमेलो शूटर**



हयासाठी तुम्हाला प्लास्टिकची शिशी किंवा कप, फुगे आणि मार्शमेलो किंवा कागदाचे चेंडू लागतील. सर्वप्रथम कपचा खालचा भाग कापा. मग फुगयाच्या वरचा भाग कापा. फुगयाच्या खाल खालच्या भागाला गाठ बांधा आणि कापलेल्या भागाला ताणून कपच्या एका बाजूवर लावा. मग मार्शमेलो किंवा कागदाचा चेंडू कपच्या आत टाका, फुगा ओढून सोडा जेणे करून मार्शमेलो किंवा कागद बाहेर फेकला जाईल. कोण सर्वात दूर पर्यत सोडतो हयाची स्पर्धा लावा.


## काल रेखा 11


शलमोन कोणत्या वर्षी जन्मला? उ. आपल्याला नेमके माहित नाही परंतू असे मानले जाते की तो ख्रिस्त पूर्व 989 मध्ये जन्मला.

शलमोन कोणत्या वर्षी मरण पावला? उ. आपल्याला नेमके माहित नाही परंतू असे मानले जाते की तो ख्रिस्त पूर्व 931 मध्ये मरण पावला.

## कोडे उत्तर11

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | श | नं | ध | दा | वी | द | णे | ध | खि |
| नं | अ | भि | व | च | नं | क | श्री | प्रा | श |
| श्री | णे | र्प | खि | अ | च | श | र्थ | च | ती |
| णे | र्थ | दी | ण | नं | जा | ना | णे | नं | मं |
| ध | र्प | र | ज्ञा | ध | रा | दी | अ | र्प | श्री |
| बा | न | खि | दी | श्री | नं | त्मा | क | श | र्प |
| क | नं | श | च | मं | ज्ञा | आ | श्री | ल | नं |
| णे | दी | अ | सो | क | र्प | खि | णे | मो | अ |
| ध | वि | नं | ती | क | र | णे | ज्ञा | न | ने |
| च | र्थ | श्री | श | खि | स्ती | क | दी | सो | नं |





## प्रश्न आणि उत्तर 11


**(मोठ्या मुलांसाठी)**

1. आपण आपला आत्मा आणि जीव हयाची काळजी कशी घेवू शकतो? (काही भौतिक गोष्टी सांगा, जसे न सिगरेट पिणे, मादक पदार्थ न घेणे, लग्न होई पर्यंत शारीरिक संबंधासाठी संयम ठेवणे, अयोग्य चित्र न पाहणे. आणखी मनाची काळजी घेण्यासाठी वेगवेगळया गोष्टी सांगा जसे इतरांना क्षमा करण, इतरांना प्रेमाने आणि प्रितीने वागविणे, पापांसाठी पश्चाताप करणे आणि चांगली वृत्ती ठेवणे. कठीण पापांवर मात करण्यासाठी व्यवहारिक मार्ग पाळक किंवा शिक्षक हयांच्या कडे ते कबूल करणे आहे आणि त्यांना प्रार्थना किंवा मदत मागणे आहे. उदा. त्यांना तुम्हाला दर आठवडयात विचारू दया की पापा विरूध्द वयैक्तिक लढाईत तुम्ही कसे करत आहात.)
2. ख्रिस्ती असणे मजेचे आहे काय? (नक्कीच! पण त्या वेगळी मजा आहे. एखादया नवीन देखण्यामुला बरोबर नाचणे आणि चांगले वाटणे अशी ती मजा नाही. ते वेगळे आहे, आनंद, शांती आणि स्वातंत्र्य खरे आहे आणि जग देते त्या पेक्षा ते उत्तम आहे.)

3. माझे आईवडील मला नेहमी नाही का म्हणतात? (कारण ते तुम्हा सुरक्षित ठेवू इच्छितात.)


## खेळ 11

**तुटलेला फोन**



दोन संघ तयार करा आणि दोन रांगेत उभे राहा. शिक्षक रांगेतील पहिल्या व्यक्तिच्या कानात काही तरी सांगेल आणि मग प्रत्येक व्यक्ति पुढच्या व्यक्तिच्या. जो संघ सर्वात शेवटी मूळ वाक्याच्या जवळचे वाक्य सांगेल तो जिंकेल.

## हजेरी 11




वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्साहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहेः

**शलमोन**

## गृहपाठ 11

हया आठवडी तुमचा गृहपाठ आहे की कोणाला तरी प्रोत्साहित करा विशेषतः त्यांना जे तुमच्या मंडळीचे नाही दुस-या मंडळीचे आहेत. जर तुम्ही कोणाला चांगले करतांना पाहिले तर त्याचे अभिनंदन करा. जर तुम्ही येशूवर विश्वास ठेवणा-या दुस-या मुलाला काही चूक करतांना पाहिले तर कृपाळूपणे त्याला योग्य ते करण्याची आठवण दयाः असे म्हणू नका की ‘तू वाईट आहेस’  परंतू असे म्हणा की, ‘असे केल्याने देवाला आनंद होत नाही. त्या ऐवजी तू असे करू शकतोस,’ ते जे चांगले करू शकतात त्याचा सल्ला दया. बोनसः डोंगरावरील प्रवचनाचा भाग वाचा मत्तय 5-7

**वाचा**

दिवस 1: 1 राजे17:1-6
दिवस 2: 1 राजे 17:7-11
दिवस 3: 1 राजे 17:12-16
दिवस 4: 1 राजे 17:17-19
दिवस 5: 1 राजे 17: 20-24

# 12. देव आपल्याला पाहतो



**पवित्र शास्त्रातील गोष्टः एलीया**

1 राजे 17:1-24

## पाठांतर वचन 12

“तर तुम्ही पहिल्याने देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळवण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील.” मत्तय 6:33

## आवश्यकता गोष्ट 12



एक दिवस टॅफी आनंदात तिच्या बिछान्यातून उठली. त्या दिवशी ती तिच्या आई वर किती प्रेम करते हे दाखविण्यासाठी काही तरी विशेष करू इच्छित होती. ती बाहेर गेली आणि बगीच्यातून सर्वात सुंदर फुलं तिने कापले आणि आईला आवडतील अशा जागी ठेवले, मग ती भरपूर नाश्ता तयार करण्यासाठी स्वयंपाक घरात गेली. सर्वकाही विशेष रित्या रचत ‘हे सर्वात उत्तम राहील’ टॅफी म्हणाली.

शेवटी वेळ आली जेव्हा तीची आई उठली. सर्वकाही तयार करून टॅफी जेवणाच्या खोलीत तिची वाट पाहत होती. जेव्हा टॅफीची आई बाहेर आली तेव्हा तिने फुलांना महत्व दिले नाही किंवा टॅफीला शुभसकाळही म्हटले नाही. ती नाश्त्यासाठी बसली आणि पूर्ण केल्यावर तिने टॅफीचे आभार सुध्दा मानले नाही.

टॅफीला वाईट वाटले आणि तिने स्वतःला खोलीत बंद केले आणि विचार केला की तिची आई तिच्यावर प्रेम करत नाही.

## मुख्य धडा 12

विश्वासाचे विर हया मध्ये पुन्हा एकदा आपले स्वागत आहे! मागील आठवडी आपण शलमोनाच्या मंदीराबद्दल शिकलो. त्यानंतर राज्य इस्त्राएल आणि यहूदा हयात विभागल्या गेले. नंतर अहाब राजाने त्याची दुष्ट पत्नी इजबेल हिच्या बरोबर इस्त्राएलवर राज्य केले. त्यांच्या दुष्टपणामूळे देवाने एलीया नावाचा संदेष्टा पाठविला हे सांगण्यासाठी की काही वर्ष पाऊस पडणार नाही. त्या वेळेस एलीया ओसाड प्रदेशात लपला. इतर कोणी पाहत नसले तरी आपण कोणत्या परिस्थितीतून जात आहोत हे देव पाहतो, आधीच्या टॅफीच्या गोष्टी प्रमाणे. तुम्ही इतरांसाठी जे काही करता ते व्यर्थ जात नाही. देव आपल्या गरजा पूर्ण करेल आणि ते करण्यासाठी त्याला पैसा किंवा साधारण मार्गाची गरज नाही. देवाने एलीयाला ओहळातून पाणी पूरविले कावळयाच्या द्वारे दिवसातून दोनदा भाकर व मास पूरविले. जेव्हा ओहळ कोरडा झाला तेव्हा देवाने एलीया असाधारण जागेवर पाठविले एखादया श्रीमंत माणसाकडे नव्हे तर विदेशी विधवेकडे. जेव्हा एलीयाने भाकर मागितली तेव्हा ती म्हणाली की तिच्याकडे थोडेसे पीठ व तेल उरले आहे आणि तिला वाटले त्यानंतर त्यांचे कुटुंब मरेल. तुम्ही कधी विश्वासाचा खेळ खेळले काय ज्यात तुम्ही माग पडता आणि

मित्र तुम्हाला जमीनीवर पडण्याआधी पकडतो? स्वयंसेवका बरोबर करून दाखवा. कधी कधी तुम्ही थकण्याआधी देव शेवटच्या क्षणापर्यंत थांबतो कारण त्याला माहित आहे की त्यामूळे तुमचा त्याच्या वरील भरवसा व विश्वास वाढेल. एलीयाने तिला सांगितले काळजी करू नको माझ्यासाठी भाकर तयार करा. त्याच रितीने येशू आपल्याला सांगतो की प्रथम त्याचे राज्य मिळविण्याची खटपट करा आणि तो तुम्हाला ज्याची गरज आहे ते पूरवेल. (मत्तय 6:33) चमत्कारिक रित्या तिचे पिठ व तेल कधी संपले नाही आणि त्यांच्या कडे खाण्यासाठी नेहमी भाकर होती. जर तुम्ही विचाराल, 'हया आठवडयात मी कसे जेवण करणार? मला शाळेसाठी आवश्यक कपडे कुठुन मिळतील?' तर पहा की देव कसा पूरवठा करतो. मग कोणालातरी त्या बद्दल सांगा आणि ते लिहा जेणे करून तुम्ही नंतर ते विसरणार नाही. तुम्ही देवाला तुमच्या साठी पूरवठा करतांना पाहिले काय? लहानशी वयैक्ति गोष्ट सांगा.

देव केवळ अन्न आणि वस्त्र पूरवत नाही तर तो जीवनही देतो. विधवेचा मुलगा आजारी पडला व मरण पावला आणि एलीयाने त्या मुलाला घेतले व तीनदा प्रार्थना केली. तुम्ही तुमच्या अविश्वासणा-या कुटुंबा व मित्रांसाठी केवळ एकदा नव्हे तर वारंवार प्रार्थना करू शकता. एलीयाने तिस-यांदा प्रार्थना केल्यानंतर देवाने मुलांला पुन्हा जीवंत केले! येशू मरण पावला आणि पुन्हा जीवंत झाला आणि सदा सर्वकाळसाठी जीवंत आहे. जरी आपले शरीर मरते तरी आपल्या प्रत्येकाला आत्मा आहे जो सदासर्वकाळसाठी जीवंत राहतो. येशू म्हणाला की शत्रू चोरी, घात व नाश करण्यासाठी येतो परंतू येशू हयासठी आला की आपल्याला विपूल जीवन प्राप्त व्हावे. (योहान 10:10) येशू ख्रिस्ताच्या द्वारे तुम्ही देवाबरोबर सदासर्वकाळसाठी राहू शकता.

मी विश्वास ठेवतो की देव मला पाहतो. देव माझ्यावर प्रिती करतो आणि मला ज्याची गरज आहे ते तो नेहमी पूरवेल.


## निर्णय 12



दुस-या दिवशी रविवार शाळेत ते शिकले की देव सर्वकाही पाहतो. शिक्षकाने प्रत्येक विद्यार्थ्याला फूल दिले. टॅफीच्या लक्षात आले की देव तिच्या बरोबर बोलत आहे व म्हणत आहे, 'शाब्बास,' तिने आईसाठी जे केले त्या बद्दल

## कृती 12

प्रभू शुभसकाळ




एका कागदाच्या तुकडयावर मुलांना 'प्रभू शुभसकाळ' लिहायला लावा. ते मार्कर, रंगकांडया हयाने सजवा. मुलं ते त्याच्या झोपण्याच्या खोलीच्या छतावर किंवा त्यांच्या पलंगाच्या समोर लावतील. कृती ही आहे की दररोज सकाळी उठल्याबरोबर ते देवाला सांगतील, 'प्रभू शुभसकाळ.' हया मुळे त्यांना आठवण होईल की देव नेहमी त्यांच्या बरोबर आहे.

## काल रेखा 12

एलीया आणि विधवा हयाचा प्रसंग कोणत्या वर्षी घडला? उ. अंदाजे ख्रिस्त पूर्व 868 मध्ये.

## कोडे उत्तर 12

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| K | O | O | R | B | Q | H | G | U | Q | D | R |
| G | P | D | C | U | I | G | I | F | L | E | C |
| U | R | C | N | X | L | U | L | X | V | C | H |
| E | O | D | E | A | D | O | J | I | E | I | I |
| L | V | I | E | L | U | N | V | C | O | T | L |
| I | I | Q | S | R | P | E | D | F | O | O | D |
| J | D | G | N | U | D | A | E | R | B | N | Q |
| A | E | S | U | F | F | I | C | I | E | N | T |
| H | S | D | E | E | N | D | I | X | G | U | D |
| L | W | O | D | I | W | U | N | E | V | A | R |





## प्रश्न उत्तर 12

**(मोठ्या मुलांसाठी)**

1. देवाने तुमच्यासाठी काही तरी पूरविले हयाची साक्ष तुमच्याकडे आहे काय? ती सांगा. मुलांना सांगण्यासाठी वेळ दया.
2. देवाने मला का निर्माण केले? (देवाच्या प्रिती बद्दल, त्याची सेवा करण्याच्या पर्यायाबद्दल आणि देव तुमच्या बद्दल सर्व काही कसे जाणतो जसे तुमचे दानं, प्राथमिकता आणि स्वभाव हया बद्दल बोला.)
3. जर देव सर्व काही पाहू शकतो तर तो आपल्या चूका सुध्दा पाहतो. जेव्हा कोणी चूक करतांना पकडला जातो तेव्हा त्याला काय वाटते? (अशा परिस्थितीत तुम्ही चूक मानली पाहिजे. परिस्थितीबद्दल बोला चूक मान्य करणे किती कठिण आहे. त्यांना तुम्हाला हे सांगू देऊ नका की ते कधीच चूका करत नाहीत आणि पकडले जात नाहीत, कारण ती लबाडी असेल!)

## खेळ 12

**मी फुगा फोडतो!**




1.सुरवात करण्यासाठी प्रत्येक मुलाच्या पायाला फुगवलेला मोठा फुगा बांधा.

2. संगीत वाजवा आणि मुलांना खोलीच्या मध्ये खेळायला लावा.

3. सर्व मुलांनी स्वतःचा फुगा फुटण्यापासून वाचवत इतर कोणाच्या तरी फुगयावर पाय ठेवावा.

4. ज्या मुलांचे फुगे फुटतील ते खेळातून बाद होतील.

उद्देशः स्वतःच्या फुगयावर इतरांना पाय न देऊ देता दुस-याचे फुगे फोडणे.




## हजेरी 12

वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्सािहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहेः
**एलीया**

## गृहपाठ 12

एका कागदावर, 'प्रभू शुभसकाळ' लिहा आणि तुमच्या पलंगाजवळ लावा जेणे करून तुम्ही सकाळी उठल्यावर तुम्हाला ते दिसेल. हया मूळे तुम्हाला हे लक्षात ठेवण्यास मदत होईल की देव तुम्हाला पाहतो. जर हया आठवडीयात तुम्हाला काही अडचण असली तर देवाला मागा. आणि देव कसा पूरवितो ते पहा आणि पुढील वेळेस तुमच्या शिक्षकांना ते सांगा.

**वाचा**

दिवस 1: 1 राजे 18:16-21
दिवस 2: 1 राजे 18:22-26
दिवस 3: 1 राजे 18:27-35
दिवस 4: 1 राजे 18:36-39
दिवस 5: 1 राजे 18:40-46

# 13. एकमेव देव



**पवित्र शास्त्रातील गोष्टः एलीया आणि संदेष्टे**

1 राजे 18:16-46

## पाठांतर वचन 13

“हे परमेश्वरा, तू माझा देव आहेस; मी तुझी थोरवी वर्णीन, तुझ्या नामाचे स्तवन करीन कारण तू आश्चर्यकारक कृत्ये केली आहेस; तू आपले पुरातन संकल्प पूर्ण सत्त्वशीलतेने सिद्धीस नेले आहेत.” यशया 25:1

## आवश्यकता गोष्ट 13



एका दिवशी शाळेत कीपच्या लक्षात आले की शाळेचे शिक्षक बरे नव्हते. कीपने त्यांना सांगितले की त्याला माहित आहे की त्यांना कोण बरे करू शकतो. शिक्षक म्हणाले, ‘काळजी करू नकोस मी एका स्त्रीकडे गेलो जिने माझ्यावर विधी केली आणि मला औषध दिले. मला बरे वाटत आहे. शिक्षकांनी कीपची मदत घेतली नाही.

## मुख्य धडा 13

मागील वेळी आपण एलीया संदेष्ट्या बद्दल शिकलो. त्या वेळेस, इस्त्राएल एकाच वेळेस अनेक देवांची भक्ति करण्याचा प्रयत्न करत होते. परंतू देवाची इच्छा आहे की आपण इतर कोणाचीही भक्ति करू नये, कारण त्याच्या शिवाय अन्य देव नाहीत. येशू म्हणाला आपण दोन धन्याची चाकरी करू शकत नाही, आपण एकाचा द्वेष करू व दुस-यावर प्रिती करू एकाशी विश्वासू राहू व दुस-याची अवहेलना करू. (मत्तय 6:24) एलीया संदेष्ट्याने सर्व इस्त्राएल व खोटया देवाचे संदेष्टे कार्मेल डोंगरावर आणले. त्याने इस्त्राएलला ख-या देवाची निवड करण्यास व त्याची सेवा करायला सांगितले. त्याने बालच्या संदेष्ट्यांना वेदी करायला सांगितली आणि यज्ञाची तयारी करायला लावली, आणि एलीया देखील आपल्या देवासाठी तसेच करणार होता. जो देव अग्नी द्वारे उत्तर देईल तो खरा देव ठरेल. आपण अधीच्या उदाहरणात कीपच्या शिक्षका बद्दल पाहिले. बालच्या संदेष्टयांनी जसे म्हटले तसे केले परंतू उत्तर आले नाही. काही वेळा नंतर एलीयाने त्यांना विचारले त्यांचा देव झोपला असेल किंवा प्रवासात असेल किंवा व्यस्त असेल. आपल्याला कधी काळजी करण्याची गरज नाही कारण आपला देव झोपत नाही, कधी प्रवास करत नाही कारण तो एकाच वेळी सर्वत्र असतो, तो अमर्याद रित्या ज्ञानी आहे आणि सर्व जग एकाच वेळेस हाताळू शकतो. दुसरा देव बाल हयाने कधीच उत्तर दिले नाही किंवा अर्पणावर अग्नी पाठविला नाही. दुपारी एलीयाने त्याचे अर्पण तयार केले. त्याने वेदी बांधली आणि त्यावर अर्पण ठेवले आणि त्यावर भरपूर पाणी ओतले जेणे करून ते जळणे कठिण होईल. त्याने त्यांना तो पर्यत पाणी ओतायला लावले जोवर वेदीच्या सभोवतीची नाली पाण्याने पूर्ण भरली नाही. एखादी गोष्ट किती कठिण आहे हयाने फरक पडत नाही, आपण देव सर्व समर्थ आहे आणि काहीही करू शकतो. एलीयाने प्रार्थना केली आणि देवाने लगेच उत्तर दिले आणि स्वर्गातून अग्नी पाठविला! अग्नीने वेदीचे दगडे, पाणी आणि त्याच्या सभोवतीची धूळ हयाच्यासहित सर्वकाही भस्म केले. येशू म्हणाला की तो देवाकडे जाण्याचा एकमेव मार्ग आहे आणि तो सत्य व

जीवन आहे. (योहान 14:6) येशू शिवाय स्वर्गात जाण्याचा दुसरा कोणताच मार्ग नाही कारण एकमेव ख-या जीवंत देवाशिवाय दुसरा देव नाही. आपल्या देवाची भक्ति करणे म्हणजे इतर कोणत्याही धर्माचे अनुसरण न करणे किंवा कोणत्याही इतर देवाची सेवा न करणे. परंतू आणखी एक समस्या आहे की जी आपल्याला सहज फसवू शकते. आपण दोन धन्यांची चाकरी करू शकत नाही असे येशूने म्हटल्यावर तो म्हणाला दुसरी एक गोष्ट आहे ज्याची लोक सेवा करतात. येशू म्हणाला आपण देव व पैसा हया दोघांची चाकरी करू शकत नाही. (मत्तय 6:24) चांगले कपडे, चांगली गाडी, घर, खेळणी, आणि हुद्दा हवे असणे सोपे आहे. तुम्ही कधी कधी हया गोष्टी प्राप्त करू शकत नाही, परंतू देवापेक्षा इतर कोणतीही गोष्ट महत्वाची होवू देऊ नका. लक्षात ठेवा मागच्या वेळेस आपण शिकलो प्रथम त्याचे राज्य व त्याची धार्मीकता मिळविण्याची खटपट करा आणि देव आपली काळजी घेईल हा विश्वास ठेवा. (मत्तय 6:33) येशू म्हणाला देवाची भक्ति करा आणि केवळ त्याचीच सेवा करा. (लूक 4:8)

मी एकमेव खरा देव हयाची भक्ति करण्याची आणि त्याला माझ्या जीवनात प्रथम स्थान देण्याची निवड करतो.

## निर्णय 13




काही वेळ गेला आणि शिक्षक ठिक होते परंतू निरोगी नव्हते. एक दिवस आला जेव्हा ते अधिक आजारी झाले आणि त्यांना कीपची आठवण आली व ते त्याच्या बरोबर बोलले. कीपने पाळकांना शिक्षकाकडे आणले. त्यांनी त्यांच्यासाठी प्रार्थना केली आणि ते पूर्णपणे बरे झाले. शिक्षकाने त्याच्या मनात येशूचा स्वीकार केला आणि मान्य केले की सामर्थ केवळ देवाकडे आहे.

## कृती 13

**ओळख बिल्ला**

प्रत्येक मुलासाठी दाखविल्या प्रमाणे बिल्ला कापा. प्रत्येक जण चित्रात दाखविल्या प्रमाणे स्वतःची माहिती लिहेल आणि त्याला लॅमिनेट करील किवा कॅन्टॅक्ट पेपर किंवा पारदर्शक टेप लावून त्याला मजबूत करेल. गळयात लटकविण्यासाठी चेन, रिबीन किंवा धागा लावा. ते त्यांना हे लक्षात ठेवण्यासाठी मदत करेल की ते केवळ आणि केवळ प्रभू येशू ख्रिस्ताचे आहेत.






**देवाच्या मालकिचा आहे.**

नावः रवी
आवडता रंगः निळा
आवडते जेवणः गोड ब्रेड

## काल रेखा 13

एलीया आणि इतर संदेष्टयांचा वृत्तांत केव्हा घडला? उ. अंदाजे ख्रिस्त पूर्व 866 मध्ये

## कोडे उत्तर 13

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्ञ | वा | से | दी | ना | ली | र्मे | व | णी |
| या | अ | सा | म | र्थ्य | शा | ली | शा | दे |
| र्मे | ली | बा | शा | ज्ञ | अ | व | बा | म |
| व | म | ए | र | सं | शा | भ | क्ति | र |
| शा | णी | दी | र्मे | व | दे | ज्ञ | म | व |
| णी | दी | वे | णी | अ | पा | ष्टे | र | सा |
| पा | अ | पा | ना | बा | दी | र्मे | णी | ज्ञ |
| ज्ञ | का | र्मे | ल | डों | ग | र | अ | ती |
| र्मे | व | ग्नी | भ | शा | ज्ञ | म | प्रि | र्मे |
| बा | णी | दी | अ | र | य | णी | व | र |






## प्रश्न आणि उत्तर 13

**(मोठ्या मुलांसाठी)**

1. देवाला सोडून इतर कोणत्या गोष्टींची सेवा करण्याचा आपल्याला मोह होतो? (अनेक ठिकाणी इतर देवांची सेवा करण्याचा मोह आहे, उदा. जेव्हा ख्रिस्ती असणे प्रसिध्द नाही किंवा कुटुंब तुमच्यावर दबाव टाकते किंवा जेव्हा शाळेत सण असतो. इतर गोष्टींची सेवा करण्याचा मोह असतो, उदा. पैसा, प्रसिध्दी, सौंदर्य, अन्न, स्थान, गर्व आणि स्वार्थ इ. उदा.ची चर्चा करा.)
2. इतर धर्माचे इतर देव कोणते आहेत? (पवित्र शास्त्र सांगते ते देव नाहीत परंतू ते दुष्ट आत्मे आहेत जे लोकांना फसविण्याचा प्रयत्न करत आहेत आणि आपल्याला एकमेव देवापासून वेगळे करत आहेत. पवित्र शास्त्र सांगते देव इतर देवांचा न्याय करणार आहे, म्हणजे दुष्ट आत्मे सर्वकाळच्या अग्नीच्या सरोवरात फेकले जातील, परंतू जे त्याचा विश्वास आणि भरवसा प्रभू येशू ख्रिस्तावर ठेवतील ते देवाबरोबर सदासर्वकाळसाठी स्वर्गात राहतील. देव पवित्र शास्त्रात अनेक वेळेस सांगतो की आपण भिऊ नयेः की हया जगात आपण केवळ देवाचे भय धरले पाहिजे, आणि तो आपल्या बाजूचा आहे व आपल्यावर प्रिती करतो.) (1 करिंथ 10:20, मत्तय 10:28-31, स्तोत्र 103:13, रोम 8:31)

3. मी देवाकडून सुट्टी घेऊ शकतो काय? (देवावर प्रिती करणे व त्याची सेवा करणे एक दिवस करून दुस-या दिवशी न करणे असे नाही. लोकांबद्दल बोला, त्यांचे नाव न घेता, ज्यांना तुम्ही देवाकडुन सुट्टी घेतांना पाहिले.)

## खेळ 13



रिले शर्यत

दोन संघ तयार करा आणि त्यांना दोन ओळीत खेळण्याच्या खोलीच्या किंवा जागेच्या आजूबाजूला उभे करा. एक एक करून खेळाडू लंगडी घालत दुस-या बाजूला जाईल आणि एक शब्द किंवा अक्षर ठेवील, 'आम्ही केवळ देवाची सेवा करणार' जो संघ सर्वात आधी पूर्ण करेल तो जिंकेल.




## हजेरी 13

वर्गाला आल्या बद्दल मुलांना आजचे कार्ड दया. त्यांचे अभिनंदन करा आणि त्यांना पुढील आठवडी आणखी एक कार्ड जिंकण्यसाठी येण्यास प्रोत्सिाहित करा, जेणे करून ते वीरांचा खेळ खेळू शकतील. आजचे कार्ड आहेः

**देवाचा अग्नी**

## गृहपाठ 13

तुमची आवडती गोष्ट जशी खेळणी, कपडे, पिश्वी, पैसे इ. हयाचा विचार करा. तुम्ही देवाची सेवा करून इतर कोणाचा कसा फायदा करू शकता हयाचा विचार करा. जर ती खेळणी आहे तर तुम्ही ती वाटून घेवू शकता आणि इतर कोणाला तरी त्याच्या बरोबर खेळू दया. जर ते कपडे असतील तर तुमच्या लहान बहिण भावाला ते वापरू दया. जर ते पैसे असतील तर ते मंडळीला किंवा ज्याला त्याची गरज आहे त्याला दया. जर ते भौतिक नसेल तर, उदा. दान किंवा अभ्यासाची योजना तर देवाकडे प्रार्थना करून म्हणा, 'देवा हे दान, शिक्षण, क्षमता, स्वप्न इ. तुझे आहे. मी तुझी सेवा कशी करू शकतो आणि त्या द्वारे इतरांची कशी मदत करू शकतो हयासाठी माझे मार्गदर्शन कर.' ऐच्छिकः जर तुम्ही अशा परिस्थितीत राहता जिथे तुमचे कुटुंब किंवा समाज इतर देवाची उपसना करतात तर त्यात सहभागी होवू नका. जर तुमच्यावर जबरदस्ती केली जाते तर देवाकडे प्रार्थना करा त्याला तुमचे संपूर्ण मन दया आणि त्याचे संरक्षण मागा आणि त्याला परिस्थितीसाठी मदत मागा. देव जो सर्व पेक्षा मोठा आणि सामर्थ्यशाली आहे तो तुमचे मन पाहतो.

**वाचा**

काहीही वाचन नाही.

Maestro Héroes 2
Marathi
12032

www.LosNinosCuentan.com
pedidos@losninoscuentan.com
México: 01-800-839-1009 01-592-924-9041
Guatemala: pedidosguate@losninoscuentan.com
Venezuela: pedidosvenezuela@losninoscuentan.com

मुले महत्वपूर्ण आहेत